सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN 978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

PRGI NO. MAHMUL/2005/16099

• पुणे • वर्ष : २२ • अंक ०५ • ऑगस्ट २०२६ • पृष्ठे ४० • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी

## महाराष्ट्रात 'भारत टॅक्सी' सेवेचा शुभारंभ




## स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



- सहकार क्षेत्रातील टॅक्सी सेवा
- टॅक्सी चालक 'मालक' होणार
- कॉसमॉस बँक टॅक्सीसाठी कर्जपुरवठा करणार




## भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ निवडणुकीत सहकार भारतीचे वर्चस्व



सहकार क्षेत्रातील योगदानाबद्दल विद्याधर अनास्कर यांचा सत्कार

### सहकार भारती - महाराष्ट्र प्रदेश

## नारीशक्ती सहकारिता संमेलन

**३ व ४ ऑक्टोबर २०२६, शिर्डी**

सहकार चळवळीतील सर्व महिलांनी

**मोठ्या संख्येने सहभागी व्हा!**


राजर्षी शाहू
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा
• ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
• बँको पुरस्कार प्राप्त संस्था
• FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
• मल्टीस्टेट फेडरेशनचा सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
आधारवड
रा. ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
— नव्या युगाचा, नव्या विचारांचा...
— घडवू प्रगतीशील भारत उद्याचा...
स्वातंत्र्य दिन
चिरायू होवो!
15 ऑगस्ट
ईद-ए-मिलाद-उन-नबी
की मुबारकबाद
रक्षाबंधन
निमित्त हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक: संदीप शेळके
संस्थापक अध्यक्ष - राजर्षी शाहू मल्टीस्टेट
को. ऑप क्रेडीट सोसायटी बुलडाणा
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटी लि. बुलडाणा
तुमच्या सेवेत सदैव तत्पर..!
LOAN
सेवा सुविधा
GOLD LOAN
उपलब्ध
LOCKERS
सुविधा
NEFT, RTGS
सुविधा उपलब्ध
DEPOSIT
सुविधा
MSEDCL
वीज बिल भरणा केंद्र
SHAHU
PAY
CORE
बँकिंग
NET
बँकिंग
MOBILE
बँकिंग
SMS
अलर्ट
DOORSTEP
बँकिंग
अनेक प्रकारच्या पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
राजर्षी शाहू संस्थेची वैशिष्ट्ये -
• एकूण ६१ शाखेचा विस्तार
• २००० कोटींचा व्यवसाय
• १,५०,००० सभासद संख्या
• 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था.
• महिला बचत गटाच्या माध्यमातून ७५ हजार महिलांना २५० कोटी रुपयांचे कर्ज वाटप.
• १०५ कोटी रु. सोने तारण कर्ज वाटप.
+91-93599 41853
rajarshishahumultistate.com
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा


दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
32
ह्या स्वतंत्र भारताच्या
प्रत्येक नागरीकाला करूया
वित्तीय संकटातून चिंतामुक्त
स्वातंत्र्य दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
15 ऑगस्ट
5000/-
कोटींच्या
व्यवसायाकडे
यशस्वी वाटचाल...
गोल्ड लोन
• सुलभ प्रक्रिया
• जलद कर्ज वाटप
• किमान दस्तऐवज
व्याजदर
0.90%
प्रति माह
• योजना सर्व शाखेत उपलब्ध 9822272947
सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अर्लट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2335 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
BANKING P.O
180 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
Launch Your Banking Career For FREE!
8055026129
Join the Dharampeth Mahila Society
Probationary Officer Programme (P.O)
Enroll Now & Grab The Opportunity
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2524337, 2520303 | ई-मेल : info@dpmahila.com


टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
उद्योजकांना खेळते भांडवल मिळवण्यासाठी
टीजेएस्बी बँक गोल्ड ओव्हरड्राफ्ट कर्ज – एक स्मार्ट निवड.
मुख्य वैशिष्ट्ये
₹25 लाखांपर्यंत कर्ज
कमीत कमी कागदपत्रे
निधीची त्वरित उपलब्धता
शून्य पूर्वपरतफेड शुल्क
व्यवसाय विस्तारासाठी
सुलभ परतफेडीचा पर्याय
आकर्षक व्याजदर
TJSB SAHAKARI BANK LTD.
Pay XXXXXXXX XXXXXXXX XXXXXXXX
Or Bearer
या धारक को
Rupees रुपये One Lakh Only
₹ 1,00,000/-
Payable at par at all TJSB branches
अटी लागू*
www.tjsb.bank.in | ✆ : 022-48897210


netwin
Ideas to Life
आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) सह स्मार्ट बँकिंगचा नवा अनुभव!
शासकीय नियमावलीवर आधारित अत्याधुनिक कोअर बँकिंग सोल्यूशन
NPA व्यवस्थापन आणि सुबक रिपोर्ट्सची सुविधा
सुलभ कर्ज अर्ज – सुरक्षित, सोपी आणि जलद डिजिटल प्रक्रिया!
संस्थेच्या वाढीसाठी NetPay UPI QR कोड सुविधा
Certification
netwin
Ideas to Life
नाविन्य, विश्वास आणि गुणवत्तेचं प्रतीक.
AI-सक्षम प्रणालीद्वारे आधुनिक आणि गतिमान बँकिंग सेवा
तुमचा चेहरा तुमची ओळख – खाते उघडण्यासाठी फक्त एक सेल्फी पुरेशी!
आधार OTP आणि डिजिटल ई-केवायसी द्वारे खाते सुरु करा
बायोमेट्रिक वर आधारित अचूक प्रमाणीकरण
स्मार्ट डॅशबोड्‌र्स आणि रिअल टाईम डेटा नियंत्रणाची सुविधा
संपूर्णतः पेपरलेस, जलद आणि सुरक्षित व्यवहार अनुभव
आजच आपल्या संस्थेला बनवा AI-सक्षम!
०२५३ ६६५ १५००
अधिक माहितीसाठी स्कॅन करा
sales@netwinindia.in
www.netwin.in



आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...
चारचाकी...
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
जनसेवा कर्ज !
TUCSON
आपल्या आवडत्या
टू व्हिलरसाठी
किफायती
कर्ज फक्त जनसेवेचे !
स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास
जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !
करा जगाची सफर !
जनसेवा आहे हमसफर !
जनसेवा पर्यटन कर्ज
• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी
संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.bank.in
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

|| बिना संस्कार नहीं सहकार ।
बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

ऑगस्ट २०२६ (वर्ष २२, अंक ०५)

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ : (सहकार भारतीचे पद)**
डॉ. उदय जोशी, संचालक (राष्ट्रीय अध्यक्ष)
सीए सतीश मेढी, संचालक (राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर, संचालक (क्षेत्र संघटन प्रमुख)
श्री. भालचंद्र कुलकर्णी, एमडी (राष्ट्रीय प्रकाशन प्रमुख)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**वर्गणीचे दर**

**वार्षिक वर्गणी : रु. ७००/– फक्त**
**त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/– फक्त**
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**
**Please Visit : www.sahakarsugandha.org**

**QR कोड**

**कृपया QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे. किंवा खालील बँक खात्यात थेट रक्कम जमा करावी.**

**A/c Name**

**A/c Name :**
**Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

**सहकार सुगंध कार्यालय**

**ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,**
**५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर,**
**गणेशमळा, सिंहगड रोड,**
**पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३**
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

**'सहकार सुगंध'** हे मासिक **मालक,** सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी **प्रकाशक** भालचंद्र वसंत कुलकर्णी यांनी **मुद्रक** विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, शॉप नं.२, कोणार्क उद्योग, स.नं. १७७, एरंडवणा, पुणे ४११ ००४ येथे छापून ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. **संपादक** – भालचंद्र वसंत कुलकर्णी

**'Sahakar Sugandha'** monthly is owned by Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., Published by Bhalchandra Vasant Kulkarni at Office No. 15, Vishnu Priya Apartment, Ganeshmala, Sinhagad Road, Pune 411 030 Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, S.N. 177, Erandwane, Pune 411 004.
**Editor :** Bhalchandra Vasant Kulkarni

# राष्ट्रीय स्तरावर सहकार भारतीचा प्रभाव

भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ (National Cooperative Union of India - NCUI) ही देशातील सहकार चळवळीची सर्वोच्च शिखर संस्था मानली जाते. त्यामुळे या संस्थेच्या निवडणुका केवळ पदाधिकाऱ्यांच्या निवडीपुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या देशातील सहकार क्षेत्रातील वैचारिक प्रवाह, संघटनात्मक ताकद आणि भविष्यातील दिशा यांचाही वेध घेतात. यंदाची एन.सी.यु.आय. निवडणूक याच कारणाने विशेष चर्चेत राहिली. या निवडणुकीने सहकार क्षेत्रात मोठी घुसळण घडवून आणली आणि अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या समीकरणांना नवे आयाम दिले.

भारतातील सहकार चळवळीचा इतिहास सव्वाशे वर्षांहून अधिक जुना आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था, कृषी, पतसंस्था, साखर कारखाने, दुग्ध व्यवसाय, गृहनिर्माण आणि ग्राहक सहकार अशा अनेक क्षेत्रांत सहकाराने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मात्र गेल्या काही दशकांत अनेक सहकारी संस्थांमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला. अनेक ठिकाणी सहकार हा सदस्य केंद्रित न राहता सत्ताकेंद्रित झाला. परिणामी सहकाराची मूळ मूल्ये जसे की, स्वायत्तता, लोकशाही, पारदर्शकता आणि सभासदांचे हित काही प्रमाणात हिरावले गेल्याची उदाहरणे आहेत. अशा पार्श्वभूमीवर एन.सी.यु.आय. निवडणुकीत दिसलेली चुरस ही केवळ व्यक्तींची किंवा गटांची स्पर्धा नव्हती. ती सहकार क्षेत्रात नव्या नेतृत्वाचा उदय, नव्या विचारांचा आग्रह आणि संघटनात्मक पुनर्मांडणी यांचीही सूचक ठरली. या प्रक्रियेत अनेक राज्यांतील सहकारी संस्था अधिक सक्रिय झाल्या, विविध विचारप्रवाहांनी आपल्या भूमिकांचे प्रभावीपणे सादरीकरण केले आणि राष्ट्रीय स्तरावरील सहकाराच्या नेतृत्वाबाबत व्यापक चर्चा घडून आली.

या संपूर्ण प्रक्रियेत सर्वाधिक लक्ष वेधले ते सहकार भारतीच्या वाढत्या प्रभावाने. बिना संस्कार नहीं सहकार, हे ब्रीद घेवून गेली अनेक दशके सहकार भारतीने सहकार क्षेत्रात मूल्याधिष्ठित कार्यपद्धती, प्रशिक्षण, सुस्कांरित कार्यकर्त्यांची निर्मिती आणि संघटन विस्ताराबरोबरच सहकार चळवळीच्या वृद्धी आणि शुद्धीसाठी सातत्याने भर दिला आहे. निवडणुकीच्या निमित्ताने देशभरातील विविध सहकारी संस्थांशी झालेला संवाद, कार्यकर्त्यांचे जाळे आणि समन्वय यामुळे सहकार भारतीचा प्रभाव स्पष्टपणे जाणवला. याचा अर्थ असा नाही की, सहकार भारतीने सर्वत्र वर्चस्व प्रस्थापित केले; परंतु सहकार क्षेत्रातील चर्चेच्या केंद्रस्थानी स्वत:ला प्रभावीपणे आणण्यात ती यशस्वी ठरली, हे नाकारता येणार नाही. अनेक दशकांपासून विशिष्ट गटांच्या प्रभावाखाली असल्याचे मानले जाणारे राष्ट्रीय सहकाराचे व्यासपीठ आता अधिक व्यापक स्पर्धा आणि विविध विचारांच्या सहभागासाठी खुले होत असल्याचे या निवडणुकीने दाखवून दिले.

विशेष म्हणजे, सहकार भारतीने केवळ निवडणुकीपुरता प्रचार न करता सहकाराची मूलभूत तत्त्वे, प्रशिक्षण, सुशासन, तंत्रज्ञानाचा वापर, युवा सहभाग आणि महिलांचा वाढता सहभाग यांसारख्या विषयांवर सातत्याने भूमिका मांडली आहे. त्यामुळे तिच्या प्रभावाचे मूल्यमापन केवळ निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या संख्येवर न होता, सहकार क्षेत्रातील वैचारिक प्रभावाच्या दृष्टीनेही व्हायला हवे. तथापि, कोणत्याही संघटनेचा वाढता प्रभाव ही जबाबदारी वाढवणारी देखील बाब असते. सहकार चळवळीला पक्षीय राजकारणापलीकडे नेऊन सभासदांचे हित, आर्थिक शिस्त, व्यावसायिक व्यवस्थापन आणि पारदर्शक प्रशासन या मूल्यांवर अधिक भर देणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांमध्ये युवा नेतृत्व घडविणे, डिजिटल परिवर्तन स्वीकारणे, छोट्या सहकारी संस्थांना सक्षम करणे आणि सभासदांचा विश्वास अधिक दृढ करणे ही आगामी काळातील मोठी आव्हाने आहेत.

केंद्र सरकारने सहकार मंत्रालयाची स्थापना करून सहकार क्षेत्राला चांगले महत्त्व दिले आहे. अशा वेळी राष्ट्रीय पातळीवरील संस्थांकडून अधिक उत्तरदायित्व, समन्वय आणि दूरदृष्टी अपेक्षित आहे. एन.सी.यु.आय. ही केवळ प्रातिनिधिक संस्था न राहता देशातील सहकार क्षेत्रासाठी धोरणात्मक नेतृत्व करणारे प्रभावी व्यासपीठ बनणे ही काळाची गरज आहे. यंदाची एन.सी.यु.आय. निवडणूक एका गोष्टीची स्पष्ट जाणीव करून देते की, भारतीय सहकार चळवळ एका नव्या वळणावर उभी आहे. जुन्या समीकरणांबरोबरच नवे विचार, नवे नेतृत्व आणि नव्या संघटनांची ताकद आता निर्णायक ठरत आहे. या प्रक्रियेत सहकार भारतीने आपली प्रभावी उपस्थिती नोंदवली आहे. मात्र कोणत्याही संघटनेचे खरे यश हे निवडणुकीतील विजयात नसून सहकाराच्या मूळ तत्त्वांना अधिक बळकट करण्यात असते. जर या निवडणुकीतून अधिक लोकशाही, अधिक पारदर्शकता आणि अधिक सभासद केंद्रित सहकार व्यवस्थेचा मार्ग खुला आणि प्रशस्त झाला, तर ही घुसळण सहकार चळवळीसाठी निश्चितच सकारात्मक ठरेल. सहकार भारतीचे काम त्याच दृष्टीने देशभर सुरु आहे.

जय सहकार!

**संपादकीय...**

# महाराष्ट्रातील ‘भारत टॅक्सी’ सेवेचा शुभारंभ

## देशाच्या वाहतूक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल




**नवी दिल्ली** – सहकार्य, नवोन्मेष आणि सर्वसमावेशक विकासाच्या माध्यमातून देशाच्या वाहतूक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्रात ‘भारत टॅक्सी’ सेवेचा शुभारंभ केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ‘सहकार से समृद्धी’ या संकल्पनेनुसार आणि केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या नेतृत्त्वाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी, अधिकारी आणि ‘भारत टॅक्सी’शी निगडित ’सारथी’ उपस्थित होते. ‘भारत टॅक्सी’ उपक्रमात टॅक्सी सारथींना केवळ चालक न मानता, त्यांना सेवेचे मालक, सहकारी संस्थेचे सदस्य आणि प्रगतीमधील भागीदार म्हणून ओळखले जाते आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देशाचे पहिले सहकार मंत्री अमित शाह यांच्या नेतृत्त्वाखाली सहकार क्षेत्रामध्ये घडून आलेल्या नव्या क्रांतीचे परिणाम आता राज्याच्या वाहतूक क्षेत्रावर देखील दिसून येत आहेत. दिल्ली आणि गुजरात पाठोपाठ महाराष्ट्रात सुरू झालेली भारत टॅक्सी सेवेची सुरुवात, सहकाराच्या माध्यमातून रोजगार आणि रोजगाराच्या माध्यमातून समृद्धी निर्माण करण्याचा नवा पायंडा घालून देईल. गाव स्तरावरील प्राथमिक सहकारी संस्थांपासून विविध सहकारी संघटनांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी नवे व्यावसायिक नमुने विकसित करण्यासोबतच या संस्थांना बळकट, आधुनिक बनवून त्यांच्यामध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत असे त्यांनी सांगितले.

भारत टॅक्सी हा या परिवर्तनात्मक दृष्टिकोनांतर्गतचा एक महत्त्वाचा घटक आहे. ॲप आधारित टॅक्सी सेवांमुळे प्रवाशांची वाहतूक अधिक सोयीस्कर झाली आहे. मात्र सर्ज प्रायसिंग म्हणजेच मागणीत वाढ झाल्याने होणारी भाडेवाढ, छुपे शुल्क आणि ॲग्रिगेटर अर्थात अशा ॲपची सेवा पुरविणाऱ्यांचे कमिशन अशी अनेक आव्हानेही आहेत. अनेकदा प्रवासी आणि चालक दोघांनाही अडचणींचा सामना करावा लागला आहे ही बाब नमूद केली.

**※ भारत टॅक्सी आणि कॉसमॉस बँक यांच्यात करार –**

**भारत टॅक्सी आणि कॉसमॉस बँक यांच्यामध्ये सामंजस्य करार नुकताच करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, एनएमडीसीचे कर्नल हिमांशू बँकेचे अध्यक्ष सचिन आपटे, उपाध्यक्ष सीए यशवंत कासार, ज्येष्ठ संचालक प्रविणकुमार गांधी उपस्थित होते. व्यवसायासाठी बँकेने कर्ज योजना तयार केली आहे. ही योजना महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये सुरू करण्यात येणार आहे.**

**※ सहकारी तत्त्वावरील उपाययोजना –**

भारत टॅक्सी हा उपक्रम म्हणजे या समस्यांवरची एक सहकारी तत्त्वावरील उपाययोजना असल्याचे ते म्हणाले. या उपक्रमाअंतर्गत, टॅक्सी सारथी हे केवळ चालक राहणार नाहीत, तर ते सहकारी संस्थेचे मालक आणि भागधारक देखील असतील. संस्थेने मिळवलेल्या नफ्यातही त्यांचा वाटा असेल. या सेवेअंतर्गत कोणतीही सर्ज प्रायसिंग किंवा छुपे शुल्क असणार नाहीत, ही सेवा निश्चित सेवा शुल्काच्या तत्वावर चालवली जाईल. भारत टॅक्सीमुळे नागरिकांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि उत्तम दर्जाच्या वाहतूक सेवेचा पर्याय उपलब्ध होईल. या उपक्रमांतर्गत महिला प्रवाशांची सुरक्षितता, प्रवाशांशी सौजन्याची वागणूक, भाड्यासंबंधित पारदर्शकता आणि उत्तरदायी सेवा वितरण प्रणालीला प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

**※ सहकारी वाहतूक संस्थेसोबत झालेला करार –**

या उपक्रमाकरता दिवंगत दि. बा. पाटील सहकारी वाहतूक संस्थेसोबत झालेला करार महत्त्वाचा असल्याचेही ते म्हणाले. याअंतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आसपास राहणाऱ्या सुमारे तीन ते चार हजार स्थानिक भूमीपुत्रांना पतपुरवठ्याच्या सुविधेसह टॅक्सी उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांना भारत टॅक्सी मंचाशी जोडण्यासाठी प्रयत्न केले जातील. यामुळे स्थानिक तरुणांसाठी रोजगार आणि उद्योजकतेच्या नव्या संधी निर्माण होतील असा विश्वास व्यक्त केला.

**※ सहकार क्षेत्रामध्ये एका नव्या पर्वाची सुरुवात –**

केंद्रीय सहकार राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, महाराष्ट्रात ‘भारत टॅक्सी’च्या परिचालनाची सुरुवात झाल्यामुळे राज्याच्या सहकार क्षेत्रामध्ये एका नव्या पर्वाची सुरुवात होत आहे.

**पुढील पानावर...**

# देशात सहकारी तत्त्वावरील आयुर्विमा कंपनीची स्थापना होणार

## केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची घोषणा

**नवी दिल्ली** – सहकार क्षेत्रातील व्यवसायांच्या विस्तारासाठी सहकारी तत्त्वावरील आयुर्विमा कंपनीची स्थापना करण्यात येणार असल्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी जाहीर केले आहे. येत्या दोन वर्षाच्या कालावधीत देशातील ५०० शहरात भारत टॅक्सी सेवेचा विस्तार करण्यात येणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सहकार चळवळ विविध विस्ताराच्या क्षेत्रात प्रवेश करीत आहे असे नमूद करून ते म्हणाले, सहकार क्षेत्राशी संबंधित सुमारे ३० कोटी जनतेसाठी आणि देशभरातील साडे आठ लाखापेक्षा अधिक सहकारी संस्थांसाठी सहकार मंत्रालय कार्यरत आहे. राज्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या विस्तार आणि बळकटीकरणासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ५ सहकारी संस्थांना मान्यता देण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. सहकारी बँकांचा आजचा व्यवसाय सुमारे १९.९० लाख कोटी वरुन २७ लाख लोटी इतका झाला आहे तर शहरी सहकारी बँकामधील एकूण थकित कर्जाचे प्रमाण १२.८ वरुन ६.२ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे. त्यामुळे बँकांची आर्थिक स्थिती बळकट झाली आहे.



केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा

देशाच्या विविध राज्यात सध्या २६ आयुर्विमा कंपन्या कार्यरत आहेत असे नमूद करून ते म्हणाले, सहकार क्षेत्रासाठी नवीन आयुर्विमा कंपनी सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे विमा क्षेत्रात सहकारी संस्थांच्या वाढीस मदत होणार आहे असे त्यांनी नमूद केले. सहकारी संस्थांमध्ये अधिक पारदर्शकता आणि लोकशाही पद्धत बळकट करण्यासाठी सरकारने बहुराज्य सहकारी संस्था कायदामध्ये नव्याने काही सुधारणा केल्या आहेत.

---

# सहकारी बँकांनी डिजिटल सुविधा, अत्याधुनिक तंत्रज्ञान ग्राहकांना द्यावे - मराठे

**भोपाळ, मध्य प्रदेश** – शहरातील सहकारी बँकांनी डिजिटल सुविधांच्या बरोबरीने अत्याधुनिक तंत्रज्ञान ग्राहकांना आणि खातेदारांना उपलब्ध करून द्यावे. यामुळे बँकेच्या प्रगतीला हातभार लागणार आहे, अशी सूचना आरबीआय आणि नाबार्ड संचालक सतीश मराठे यांनी केली आहे. मध्य प्रदेश सहकार भारती प्रदेश बँक प्रकोष्ट आणि मध्यप्रदेश अर्बन को–ऑप. बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सहकारी बँक परिषद आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

एक दिवसीय परिषदेत विविध सहकारी बँकांचे पदाधिकारी अधिकारी सहभागी झाले होते. परिषदेत विशेषांकांचे प्रकाशन मराठे यांच्या हस्ते करण्यात आले. परिषदेच्या सुरूवातीला भारत माता पूजन करण्यात आले. सहकार गीत सादर झाल्यावर सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष शेखर यांनी स्वागत करून परिषदेच्या आयोजनामागची भूमिका मांडली. त्यानंतर मराठे यांनी भाषणात डिजिटल सुविधा आणि त्याची आवश्यकता सांगितली. यावेळी त्यांनी विविध यशस्वी उपक्रमांची माहिती सांगितली. तसेच बँकांनी स्वताचे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्याची सूचना केली.

सहकार भारती अर्बन बँक प्रकोष्ट प्रमुख अभय माटे यांनी म्नोगतात संगितले की बँकांनी डिजिटल सुविधा प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी अन्यथा त्यांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.

---

मागील पानावरून...

# महाराष्ट्रातील 'भारत टॅक्सी' सेवेचा शुभारंभ

महाराष्ट्र ही सहकाराची पावन भूमी आहे या राज्याला शंभर वर्षांहून अधिक कालावधीची सहकाराची समृद्ध परंपरा आहे. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ – एनसीडीसीच्या माध्यमातून राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना जवळजवळ दहा हजार कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. इथेनॉल आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस यांच्याशी संबंधित उपक्रमांना देखील राज्यात प्रोत्साहन देण्यात येत आहे. सहकारी गृहनिर्माण क्षेत्रासाठी स्वतंत्र कायदेशीर चौकट निर्माण करण्याच्या आणि स्वयं–पुनर्विकासाला चालना देण्याच्या दिशेने देखील महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत. सहकाराच्या माध्यमातून टिश्शू कल्चरला प्रोत्साहन देण्याच्या उपक्रमासाठी जमीन देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे, असे त्यांनी सांगितले.

*** टॅक्सी सेवा विविध भागांमध्ये विस्तारण्यात येणार –**

महाराष्ट्रातील सहकारी संस्था आणि संघटनांच्या विस्तृत जाळ्याच्या माध्यमातून येत्या काळात, भारत टॅक्सी सेवा राज्याच्या विविध भागांमध्ये विस्तारण्यात येईल. राज्यातील युवावर्ग आणि महिलांनी मोठ्या प्रमाणात भारत टॅक्सी सेवेमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. भारत टॅक्सी सेवेच्या सारथींना या प्रगतीमध्ये भागीदार करून घेऊन त्यांना सहकारी संस्थांचे लाभ मिळवून देताना ही सेवा नवे रोजगार आणि स्वयं–रोजगार निर्माण करेल, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या दरम्यान भारत टॅक्सीशी जोडलेल्या सारथींना समभागाची प्रमाणपत्रे आणि त्याच्या सेवा संचाचे वितरणही करण्यात आले. मध्यस्थ असलेली व्यवस्था बदलून त्याऐवजी सारथी केंद्रित वाहतूक आराखडा असलेली व्यवस्था प्रस्थापित करणे, सारथीच्या उत्पन्नात स्थैर्य साध्य करणे, प्रवाशांना भाड्यातील पारदर्शकतेसह सुरक्षित सेवा पुरवणे आणि संस्थेचा नफ्यात सारथींनाही वाटा मिळवून देणे हे भारत टॅक्सी या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

आगामी काळात, राज्यातील सहकारी संस्था, वाहतूक संघटना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहकार्याने अधिक टॅक्सी चालक, युवा, महिला आणि स्थानिक समुदायांना या मंचाशी जोडून टप्प्याटप्प्याने संपूर्ण महाराष्ट्रात भारत टॅक्सी सेवेचा विस्तार केला जाणार आहे.




# एनसीयूआय निवडणुकीत सहकार भारतीचे वर्चस्व

**नवी दिल्ली** – सहकारी क्षेत्रातील सर्वोच्च संस्था असलेल्या 'नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया'च्या व्यवस्थापन समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत लक्षणीय यश प्राप्त झाले आहे. मतमोजणीनंतर, युती पुरस्कृत उमेदवारांनी २० पैकी १९ जागा जिंकून नवा इतिहास रचला आहे.

*** प्रमुख विजयी उमेदवार :–** सहकार भारतीचे संरक्षक दीनानाथ ठाकूर, एनसीएफआयचे अध्यक्ष दिलीप संघानी, कृभकोचे अध्यक्ष मिनेश शहा, एनसीएफआयचे बिपीन पटेल, विशाल सिंग, महाराष्ट्राचे प्रवीण दरेकर, कर्नाटकाचे जी. टी. देवेगौडा, मणिपूरचे जिना पोतासिंगबम, गुजरातचे घन:श्याम अमीन, उत्तर प्रदेशचे धनंजय सिंग, कर्नाटकाचे एच. के. पाटील, लखनऊचे मुदित वर्मा, बेळगावचे अण्णासाहेब जोल्ले आणि महाराष्ट्राचे नकुल कडू यांचा समावेश आहे.

निवडणुकीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे १० उमेदवार बिनविरोध निवडून आले. सहकार भारतीचे राष्ट्रीय सरचिटणीस दीपक चौरसिया यांची केंद्र सरकारचे प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे तर सहकार भारतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील गुप्ता व भाजपचे विधान परिषद सदस्य संजय भेंडे यांचा निसटता पराभव झाला. सहकारी क्षेत्रातील नेत्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, एनसीयूआयच्या नवनिर्वाचित व्यवस्थापन मंडळाच्या नेतृत्त्वाखाली संस्थेची प्रतिष्ठा गौरव नव्या उंचीवर पोहोचेल आणि सहकारी चळवळ अधिक बळकट होईल.

निवडणूक प्रचाराला सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय सरचिटणीस दीपक चौरसिया, संरक्षक दीनानाथ ठाकूर, राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस बी. एल. संतोष आणि एनडीडीबीचे उपाध्यक्ष कुलदीप चहल यांच्यासह वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन लाभले. 'सहकार भारती' आणि भाजपच्या सहकार विभागाने या ऐतिहासिक विजयाचे वर्णन सहकारी चळवळ अधिक मजबूत करण्याच्या दिशेने आणि सहकारी संस्थांमध्ये सुशासन, पारदर्शकता व जबाबदारी आणण्याच्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणून केले आहे.

## राष्ट्रीय सहकार संघाच्या संचालकपदी नकुल कडू



**नगर** – नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकार संघाच्या संचालकपदी सहकार भारतीचे प्रदेश चिटणीस नकुल कडू यांचा पंडित दीनदयाळ सहकारी पतसंस्थेच्या वतीने भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नगर तालुका पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष किसन लोटके, जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेचे संतोष गांधी, पतसंस्थेचे संचालक बाबा साठे आदी उपस्थित होते. यामुळे जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर जाण्यास हातभार लागणार आहे तर सत्काराला उत्तर देताना कडू यांनी सांगितले की, सहकार क्षेत्रात काम करताना अनेकविध जबाबदाऱ्या सांभाळता आल्या. यापुढील काळातही सहकार क्षेत्राच्या वाढीसाठी, विस्तारासाठी प्रयत्न करण्यात येतील असे ते म्हणाले.

## राज्य सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्षपदी प्रा. संजय भेंडे, उपाध्यक्षपदी डॉ. दुर्गाडे

**पुणे** – महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये नागपूर नागरिक सहकारी बँकेचे अध्यक्ष व आमदार प्रा. संजय भेंडे यांची अध्यक्षपदी तसेच प्रा. डॉ. दिगंबर गणपत दुर्गाडे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



अध्यक्षपदासाठी मुदतीत केवळ एकच नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाल्यामुळे प्रा. भेंडे यांची बिनविरोध निवड झाल्याचे अध्यासी अधिकारी प्रकाश लक्ष्मण जगताप यांनी जाहीर केले. राज्य सहकार निवडणूक प्राधिकरणाचे आयुक्त अनिल कवडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन अध्यक्ष नीलेश ढमढेरे, मानद सचिव सुभाष मोहिते यांच्या उपस्थितीत प्रा. भेंडे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. दुर्गाडे गेली अनेक वर्षे सहकारी बँकिंग क्षेत्रात कार्यरत आहेत. पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्षपद त्यांनी सांभाळले आहे.

# सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा : सदस्यांचे हक्क, कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि सहभागाचे महत्त्व

सहकार म्हणजे केवळ एक संस्था नव्हे, तर परस्पर विश्वास पारदर्शकता शिस्त आणि सामूहिक जबाबदारी यांवर उभे असलेले लोकशाहीचे प्रभावी व्यासपीठ आहे. कोणत्याही सहकारी संस्थेच्या यशामागे तिचे सभासद, सक्षम संचालक मंडळ आणि पारदर्शक प्रशासन हे तीन महत्त्वाचे आधारस्तंभ असतात. तिन्ही घटकांना एकत्र आणणारे सर्वात महत्त्वाचे व्यासपीठ म्हणजे वार्षिक सर्वसाधारण सभा!




**शरद जाधव**
**प्रदेश संघटनप्रमुख,**
**सहकार भारती**
**९४२२७६१६९९**


सहकारी संस्था ही प्रत्येक सभासदाची स्वतःची संस्था असल्याने तिच्या विकासाची जबाबदारी केवळ संचालक मंडळावर नसून प्रत्येक सभासदावर तितकीच असते. म्हणूनच वार्षिक सर्वसाधारण सभा ही केवळ कायद्याची पूर्तता नसून, संस्थेच्या प्रगतीचा आराखडा तयार करणारा लोकशाहीचा उत्सव आहे.

**※ वार्षिक सर्वसाधारण सभा म्हणजे काय? –**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमांनुसार आर्थिक वर्ष ३१ मार्च रोजी संपल्यानंतर ३० सप्टेंबरपर्यंत प्रत्येक सहकारी संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभा घेणे बंधनकारक आहे. या सभेमध्ये पुढील महत्त्वाच्या विषयांवर चर्चा व निर्णय घेतले जातात. मागील सभेच्या इतिवृत्तास मान्यता. वार्षिक अहवाल सादर करणे. लेखापरीक्षण अहवाल (Audit Report). ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करणे. अंदाजपत्रक व भविष्यातील विकास योजना. संचालक मंडळाच्या कामाचा आढावा.सभासदांच्या सूचना, प्रश्न व शंका निरसन. आवश्यक ठराव मंजूर करणे.

**※ सभासदांचे हक्क –**

सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद हा संस्थेचा मालक असल्यामुळे त्याला काही मूलभूत हक्क कायद्याने प्राप्त झालेले आहेत.

१) **माहिती मिळविण्याचा हक्क –** संस्थेचे हिशोब, ताळेबंद, लेखापरीक्षण अहवाल, पोटनियम, विविध ठराव व महत्त्वाची कागदपत्रे पाहण्याचा व आवश्यक माहिती मिळविण्याचा अधिकार सर्व सभासदांना आहे.

२) **प्रश्न विचारण्याचा हक्क –** वार्षिक सभेमध्ये संचालक मंडळाला कोणत्याही आर्थिक, प्रशासकीय किंवा विकासकामांबाबत प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार.



३) **मतदानाचा हक्क –** संस्थेच्या विविध विषयांवरील निर्णयामध्ये मतदान करून आपले मत नोंदविण्याचा अधिकार.

४) **निवडणूक लढविण्याचा हक्क –** संचालक मंडळाच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहण्याचा तसेच योग्य उमेदवाराला मतदान करण्याचा अधिकार.

५) **समान वागणुकीचा हक्क –** संस्थेतील सर्व सुविधा, सेवा व अधिकारांचा कोणताही भेदभाव न होता लाभ घेण्याचा अधिकार.

६) **सूचना मांडण्याचा हक्क –** संस्थेच्या विकासासाठी विधायक सूचना मांडणे, नवीन योजना सुचविणे आणि सुधारणा प्रस्तावित करण्याचा अधिकार आहे.

**※ सभासदांची कर्तव्ये –**

हक्क जितके महत्त्वाचे आहेत, तितकीच कर्तव्येही महत्त्वाची आहेत. प्रत्येक सभासदाने पुढील जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत.

१) **आर्थिक शिस्त –** देखभाल शुल्क, सेवा शुल्क, कर्जाचे हप्ते किंवा इतर देणी वेळेत भरणे ही प्रत्येक सभासदाची प्राथमिक जबाबदारी आहे.

२) **नियमांचे पालन –** संस्थेचे पोटनियम, शासनाचे नियम व सभेतील मंजूर ठराव यांचे प्रामाणिकपणे पालन करणे.

३) **सभेला उपस्थित राहणे –** वार्षिक सर्वसाधारण सभेत नियमित उपस्थित राहून चर्चेत सक्रिय सहभाग घेणे.

४) **विधायक भूमिका –** केवळ टीका करण्याऐवजी समस्यांवर व्यवहार्य उपाय सुचविणे.

५) **सामाईक मालमत्तेचे संरक्षण –** संस्थेची इमारत, कार्यालय पाणीपुरवठा, लिफ्ट, बाग, पार्किंग सुरक्षा व्यवस्था इत्यादींची स्वतःच्या मालमत्तेप्रमाणे काळजी घेणे.

६) **इतर सभासदांचा आदर –** सभेमध्ये संयम राखणे, इतरांचे मत ऐकणे आणि सभेची शिस्त कायम ठेवणे.

७) **सभासदांची नैतिक जबाबदारी –** सहकारी संस्था केवळ कायद्याने चालत नाही; ती विश्वास, सहकार्य आणि नैतिकतेवर चालते.

प्रत्येक सभासदाने अफवा पसरवू नयेत. अपूर्ण माहितीचे आधारावर आरोप करू नयेत, संस्थेची प्रतिमा खराब होईल असे वर्तन टाळावे. संचालक मंडळाला आवश्यक ते सहकार्य करावे. नव्या सभासदांना नियम समजावून सांगावेत. संस्थेच्या विकासासाठी वेळोवेळी सूचना द्याव्यात.

**※ संचालक मंडळाची जबाबदारी –**

सभासदांचे हक्क जपणे ही संचालक मंडळाचीदेखील तितकीच जबाबदारी आहे. त्याकरता त्यांनी खालीलप्रमाणे काळजीपूर्वक संस्थेचे कामकाज केले पाहिजे.

संस्थेचे पारदर्शक प्रशासन असले पाहिजे. वेळेत लेखापरीक्षण पूर्ण केले पाहिजे. संस्थेचे कामकाज करतांना आर्थिक शिस्त पाळून आर्थिक व्यवहार केले पाहिजे. सभासदांना वेळोवेळी योग्य ती माहिती देणे बंधनकारक आहे. संस्थेच्या विकासकामांचे व्यवस्थित नियोजन केले गेले पाहिजे. संस्था कामकाज करतांना सर्व निर्णय हे कायद्यानुसार घेतले गेले पाहिजे.

**※ हक्क की कर्तव्य? –**

आज अनेक वेळा सभासद हक्कांविषयी जागरूक असतात; परंतु कर्तव्यांबाबत अत्यंत उदासीन असतात. वेळेवर शुल्क न भरणारा सभासद विकासकामांची अपेक्षा करतो, सभेला अनुपस्थित राहणारा नंतर निर्णयांवर टीका करतो, नियम न पाळणारा इतरांकडून शिस्तीची अपेक्षा ठेवतो – ही प्रवृत्ती सहकाराच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणते. त्यामुळे लक्षात ठेवावे की, आपले कर्तव्य पार पाडल्याशिवाय हक्कांची अपेक्षा अपूर्ण राहते.

**※ सुजाण सभासद कसा असावा? –**

सुजाण सभासद हा वेळेवर देणी भरतो. सभेला उपस्थित राहतो. अभ्यासपूर्वक प्रश्न विचारतो. विधायक सूचना देतो. नियमांचे पालन करतो. संस्थेच्या विकासात स्वतःचे योगदान देतो. संस्थेची प्रतिष्ठा जपतो.

**※ वार्षिक सर्वसाधारण सभा – लोकशाहीचा उत्सव –**

वार्षिक सर्वसाधारण सभा ही वादविवादाचे नव्हे, तर संवादाचे व्यासपीठ

**पुढील पानावर...**

# सहकाराला नैतिक धैर्याचे अधिष्ठान - विद्याधर अनास्कर

**पुणे** – महाविद्यालयीन काळात अतिशय दंगेखोर विद्यार्थी होतो. मित्र म्हणून मदतीसाठी कोणी आल्यास तत्परतेने मदत करीत राहिलो. मित्रांनी दिलेल्या पाठबळामुळे धैर्याची वृत्ती निर्माण झाली. प्रगतीला नैतिक धैर्याचे अधिष्ठान आहे, असे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.



केंद्रीय सहकार मंत्रालयाला पाच वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधत सहकार क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेतर्फे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांचा विशेष सत्कार सोहळा करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना अनास्कर बोलत होते.

संघटनेचे अध्यक्ष अरूण निम्हण, उपाध्यक्ष सुरेश केकाणे, सचिव सुहास पटवर्धन, बीएमसीसी उपप्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, उद्योजक संजय साबळे उपस्थित होते. अनास्कर यांना शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी आणि विठ्ठलाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

आजवर विविध पदे भूषविली आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, त्या पदांपर्यंत कसा पोहोचलो याविषयी मित्रांना आश्चर्य वाटते. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या एका वाक्याने माझ्या आयुष्याला वेगळे वळण दिले. ज्या पद्धतीने भिंगातून सूर्याची सर्व किरणे केंद्रीत झाले की, तिथे ज्वाला निर्माण होते. त्याचप्रमाणे विविध मार्गांनी, पण एका ध्येयाने काम करण्याचे सातत्य ठेवल्यास यश मिळते, हा माशेलकरांचा मंत्र मोलाचा ठरला. त्यातून सहकार क्षेत्राचा मार्ग निवडून वाटचाल केली. सहकाराचे धडे आईमुळे लहानपणापासून गिरवत गेलो.

सहकार तत्त्वावर उभा राहिलेला लिज्जत पापड उद्योग लहानपणापासून पाहिला त्यातूनच माझ्या जीवनात सहकाराची बीजे रोवली गेली. आई-वडिलांच्या संस्कारांना शिक्षणाची आणि कामातील सातत्याची जोड मिळाल्यामुळेच इथपर्यंत पोहोचू शकलो.

बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अरूण निम्हण, उपप्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष सूर्यकांत पाठक, चरणसिंग साहनी, डॉ. मुकुंद तापकीर आदींनी अनास्कर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

संघटनेचे सचिव सुहास पटवर्धन यांनी प्रास्ताविक केले. त्यावेळी ते म्हणाले की, सहकार क्षेत्रात काम करताना अनास्कर यांच्या अनुभवाचा लाभ झाला. या कार्यक्रमाला सहकार क्षेत्रातील अभ्यासक उपस्थित होते.

---

मागील पानावरून...

# सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा...

आहे. येथे व्यक्ती नव्हे तर विषय महत्त्वाचा असतो. येथे आरोप नव्हे तर उपाय महत्त्वाचे असतात. येथे राजकारण नव्हे तर संस्थेचा विकास महत्त्वाचा असतो.

सभासद आणि संचालक मंडळ यांनी परस्पर विश्वास, पारदर्शकता आणि सहकार्याच्या भावनेने काम केल्यास संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम सामाजिकदृष्ट्या आदर्श आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने उत्कृष्ट बनते. सहकारी संस्था ही 'आपली संस्था – आपली जबाबदारी' या भावनेवर उभी असते. वार्षिक सर्वसाधारण सभा ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून, संस्थेच्या भविष्याचा मार्ग ठरविणारी लोकशाहीची पवित्र परंपरा आहे. प्रत्येक सभासदाने आपल्या हक्कांचा जागरूकपणे वापर करावा; मात्र त्याच वेळी कर्तव्यांचेसुद्धा प्रामाणिकपणे पालन करणे हीदेखील तितकीच मोठी जबाबदारी आहे.

**✲ सहकाराची खरी दिशा –**

सहकार ही केवळ आर्थिक व्यवस्था नाही, तर ती विश्वास, सहभाग, पारदर्शकता आणि सामूहिक उत्तरदायित्वाची जीवनपद्धती आहे. सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद हा केवळ सभासद नसून संस्थेचा मालक, भागीदार, शिल्पकार आणि भविष्य घडविणारा घटक आहे. त्यामुळे संस्थेच्या यशाचे श्रेय जसे संचालक मंडळाला जाते, तसेच ते प्रत्येक जागरूक आणि जबाबदार सभासदालाही जाते. वार्षिक सर्वसाधारण सभा ही टीका, आरोप किंवा मतभेदांचे व्यासपीठ नसून संवाद, आत्मपरीक्षण, पारदर्शकता आणि विकासाचा मार्ग शोधण्याचे लोकशाही मंदिर आहे. येथे व्यक्ती नव्हे तर विचार मोठा असतो; मतभेद नव्हे तर मतांचे मंथन महत्त्वाचे असते; आणि विरोध नव्हे तर विधायक सहभाग संस्थेला पुढे घेऊन जातो. संचालक मंडळाने पारदर्शक कारभार करणे जितके आवश्यक आहे, तितकेच सभासदांनी वेळेवर देणी भरणे, नियमांचे पालन करणे, सभेला उपस्थित राहणे आणि विधायक सूचना करणेही आवश्यक आहे. हक्क आणि कर्तव्य ही एका नाण्याच्या दोन बाजू आहेत; एकाशिवाय दुसऱ्याला अर्थ नाही.

आज प्रत्येक सभासदाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. मी संस्थेकडून काय मिळवू शकतो? यापेक्षा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे –

मी संस्थेला काय देऊ शकतो? याच विचारातून सहकाराची खरी संस्कृती निर्माण होते. प्रत्येक सभासद जबाबदारीने वागला, प्रत्येक संचालक प्रामाणिकपणे कार्यरत राहिला. प्रत्येक निर्णय संस्थेच्या हितासाठी घेतला, तर कोणतीही सहकारी संस्था आदर्श, सक्षम आणि सर्वांसाठी प्रेरणादायी ठरू शकते सहकार हा केवळ कायद्याचा विषय नाही; तो संस्कारांचा विषय आहे. आणि जेथे संस्कार, शिस्त, पारदर्शकता आणि परस्पर विश्वास असतो, तेथेच सहकाराचे सुवर्णयुग घडते. हक्कांची जाणीव जागरूक नागरिक घडवते; पण कर्तव्यांची जाणीव आदर्श सभासद घडवते. सहकार हा स्पर्धेचा नव्हे, तर सहभागाचा मार्ग आहे सहभागातून विश्वास, विश्वासातून विकास आणि विकासातून समृद्धी जन्माला येते. सुजाण सभासद होऊया. सक्षम सहकारी संस्था घडवूया!

हक्क मागण्यापूर्वी कर्तव्य पार पाडा, प्रश्न विचारण्यापूर्वी योगदान द्या आणि टीका करण्यापूर्वी उपाय सुचवा. हाच खऱ्या सहकाराचा पाया आहे.

**– शरद जाधव, प्रदेश संघटनप्रमुख, सहकार भारती**

**मो.नं. – ९४२२७ ६१६९९** ✲✲✲✲✲

# सहकारी बँकिंगचे बदलते स्वरूप- संचालक, अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक बाबी

सहकारी बँकिंग क्षेत्र सध्या मोठ्या परिवर्तनाच्या टप्प्यावर आहे. वाढती स्पर्धा सतत बदलणारे रिझर्व्ह बँकेचे नियम डिजिटल बँकिंग, सायबर सुरक्षा, ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा आणि कर्जाच्या गुणवत्तेबाबतची वाढलेली जबाबदारी यामुळे बँक चालविणे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे. अशा परिस्थितीत केवळ व्यवसाय वाढविणे पुरेसे नाही; तर तो सुरक्षित, नियमबद्ध, शाश्वत आणि नफाक्षम पद्धतीने वाढविणे काळाची गरज आहे.



व्यंकटेश कुळकर्णी
९४०३० ८०७५१

प्रत्येक संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांनी सात महत्त्वाच्या विषयांचा सातत्याने अभ्यास करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सात विषय कोणत्याही सहकारी बँकेच्या यशाचे भक्कम आधारस्तंभ आहेत.

**१. कायदे, नियम आणि अनुपालन –** सहकारी बँकांचे कामकाज विविध कायदे, नियम आणि आरबीआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार चालते नियमांचे पालन न केल्यास दंड, निर्बंध, प्रतिमेला धक्का आणि आर्थिक नुकसान होऊ शकते. प्रत्येक निर्णय घेताना हा निर्णय नियमानुसार आहे का? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारला पाहिजे. अनुपालन ही केवळ Compliance विभागाची जबाबदारी नसून ती प्रत्येक संचालक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची सामूहिक जबाबदारी आहे. नियमांचे पालन ही संस्कृती बनली, तर संस्थेचा पाया अधिक मजबूत होतो.

**२. दर्जेदार कर्जवाटप आणि सक्षम दस्तऐवजीकरण –** कर्ज मंजूर करणे हा व्यवसायाचा प्रारंभ असतो; परंतु त्या कर्जाची सुरक्षितता योग्य मूल्यांकन पुरेशी तारण व्यवस्था आणि निर्दोष दस्त ऐवजीकरण यावर अवलंबून असते. कर्जदाराची परतफेड क्षमता कर्जाचा उद्देश, जोखीम, रोख प्रवाह आणि आवश्यक कायदेशीर कागदपत्रांची पूर्तता यांचा सखोल अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. चुकीच्या दस्तऐवजीकरणामुळे चांगले कर्जदेखील कमकुवत ठरू शकते. त्यामुळे कर्ज मंजूर करताना केवळ त्या दिवसाचा नव्हे तर संपूर्ण कर्जबाबतचा विचार केला पाहिजे. अशा दृष्टीकोनातून कर्ज मंजुरी झाली, तर भविष्यात खाते एनपीएमध्ये जाण्याची शक्यता  कमी करता येते.

**३. एनपीए नियंत्रण आणि प्रभावी वसुली –** वसुली म्हणजे केवळ थकबाकीदारांकडून पैसे गोळा करणे नव्हे; ती बँकेच्या आर्थिक आरोग्याचे संरक्षण करणारी प्रक्रिया आहे. खाते थकित होण्याची वाट पाहण्यापेक्षा वेळेवर उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. नियमित पाठपुरावा, ग्राहकांशी सातत्यपूर्ण संवाद, आवश्यकतेनुसार पुनर्रचना, कायदेशीर उपाय आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे एनपीए प्रभावीपणे नियंत्रणात ठेवता येतो. एक महत्त्वाचे तत्त्व नेहमी लक्षात ठेवावे-खात्याचे Monitoring हे Loan Disbursement झालेल्या दिवसापासून सुरू होते; खाते एसएमएमध्ये आल्यानंतर नाही. ही कार्यसंस्कृती विकसित झाली, तर एनपीए मोठ्या प्रमाणात रोखता येतात.

**४. ठेवी वाढ आणि ग्राहककेंद्रित सेवा –** बँकेच्या प्रगतीचा खरा पाया म्हणजे ठेवीदारांचा विश्वास. ग्राहकाला केवळ खाते उघडून देणे पुरेसे नसून त्याला जलद, पारदर्शक विश्वासार्ह आणि सन्मानपूर्वक सेवा देणे आवश्यक आहे. कासावाढ, नवीन ग्राहक जोडणे, विद्यमान ग्राहक टिकविणे आणि डिजिटल सेवांचा प्रभावी वापर वाढविणे ही प्रत्येक शाखेची दैनंदिन जबाबदारी असली पाहिजे. केवळ डिपॉझिट वाढवून व्यवसाय वाढल्याचा आभास निर्माण होऊ शकतो; परंतु ती दीर्घकालीन आणि शाश्वत वाढ नसते खरी व्यवसायवाढ ही व्यक्तीगत आणि कासा खाते यांच्या सातत्यपूर्ण वाढीत असते. कासामुळे ग्राहकांचा शाखेशी सतत संपर्क राहतो. त्यातून ग्राहकांशी विश्वासाचे नाते निर्माण होते आणि Cross Selling तसेच Up-selling ची संधी वाढते. याच माध्यमातून माझी बँक – माझ्या परिवाराची बँक ही Family Banking ची संकल्पना प्रत्यक्षात आणता येते.

**५. तंत्रज्ञान, डिजिटल बँकिंग आणि सायबर सुरक्षा –** बँकिंग झपाट्याने डिजिटल होत आहे इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग UPI, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित प्रणाली आणि डेटा विश्लेषणाचा वापर सातत्याने वाढत आहे. त्याचबरोबर सायबर फसवणुकीचाही धोका वाढत आहे. त्यामुळे प्रत्येक कर्मचारी सायबर सुरक्षा मानकांचे पालन करणारा संभाव्य धोके ओळखणारा आणि ते टाळण्यासाठी सक्षम असला पाहिजे. मात्र बँकेची जबाबदारी तेवढ्यावरच संपत नाही. ग्राहकांमध्येही सायबर सुरक्षेबाबत सातत्याने जनजागृती करणे, SMS Alerts, Awareness Programmes आणि इतर माध्यमांतून त्यांना सतर्क ठेवणे ही प्रत्येक बँकेची सामाजिक आणि व्यावसायिक जबाबदारी आहे.

**६. सक्षम नेतृत्व आणि सुशासन –** संचालक मंडळ धोरण निश्चित करते, तर व्यवस्थापन त्याची प्रभावी अंमलबजावणी करते. या दोघांमध्ये विश्वास, पारदर्शकता, जबाबदारी आणि परस्पर सन्मान असणे अत्यावश्यक आहे. संचालकांनी दैनंदिन कामकाजात हस्तक्षेप करण्याऐवजी धोरणात्मक नेतृत्त्व करावे. चांगल्या सुशासनामुळे निर्णय प्रक्रियेत गुणवत्ता येते, जोखीम कमी होते आणि बँकेची विश्वासार्हता वाढते. संवाद हा केवळ संचालक मंडळ आणि प्रशासनापुरता मर्यादित नसावा; तो ग्राहकांपर्यंतही पोहोचला पाहिजे. प्रत्येक शाखेने नियमित ग्राहक मेळावे आयोजित करून ग्राहकांच्या अपेक्षा, सूचना आणि अडचणी समजून घेतल्या पाहिजेत. याचबरोबर खाते बंद करून जाणाऱ्या प्रत्येक ग्राहकाचे मत घेण्याची संस्कृती विकसित झाली पाहिजे ग्राहक बँक का सोडून जात आहे, त्याच्या कोणत्या अपेक्षा अपूर्ण राहिल्या, कोणत्या सेवांमध्ये सुधारणा आवश्यक आहे, याची माहिती मिळते. अनेक वेळा ग्राहकाची समस्या तत्काळ सोडवून त्याला पुन्हा बँकेशी जोडून ठेवणेही शक्य होते. त्यामुळे हे केवळ औपचारिकता नसून प्रभावी साधन ठरू शकते.

**७. सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि ज्ञान अद्ययावत ठेवणे –** बँकिंग क्षेत्रात नियम, तंत्रज्ञान आणि ग्राहकांच्या अपेक्षा सतत बदलत असतात. त्यामुळे कालचे ज्ञान आज पुरेसे ठरत नाही. नियमित प्रशिक्षण, नवीन परिपत्रकांचा अभ्यास, अनुभवांची देवाणघेवाण आणि आधुनिक व्यवस्थापन पद्धतींचा स्वीकार यामुळे संस्था अधिक सक्षम बनते. प्रशिक्षण हा खर्च नसून भविष्यातील सुरक्षित गुंतवणूक आहे. बँकेचा कर्मचारी हीच तिची सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. कर्मचाऱ्याच्या अज्ञानामुळे झालेल्या छोट्याशा चुकीची किंमत अनेक वेळा लाखो रुपयांमध्ये किंवा बँकेच्या प्रतिमेच्या नुकसानीत मोजावी लागू शकते. त्यामुळे कर्मचारी विकासावर केलेली गुंतवणूक हीच बँकेची सर्वात फायदेशीर गुंतवणूक असते.

**✲ निष्कर्ष –** यशस्वी सहकारी बँक ही केवळ मोठ्या व्यवसायामुळे ओळखली जात नाही; तर  सुशासन, नियमांचे काटेकोर पालन, गुणवत्तापूर्ण कर्जवाटप प्रभावी वसुली, समाधानी ग्राहक सुरक्षित डिजिटल व्यवहार आणि कार्यसंस्कृती यांमुळे तिची खरी ओळख निर्माण होते. पूर्वी आरबीआय आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन असलेल्या बँकांना Financially Strong and Well Managed (FSWM) या संकल्पनेतून ओळखत असे आज त्याच संकल्पनेचा अधिक व्यापक आणि आधुनिक दृष्टिकोन ECBA च्या स्वरूपात विकसित झाला आहे. कोणतीही बँक खऱ्या अर्थाने सक्षम ठरते ती तिच्या आर्थिक ताकदीबरोबरच उत्तम व्यवस्थापन, सुशासन, जोखीम व्यवस्थापन आणि नियामक अनुपालनामुळे! प्रत्येक संचालक, अधिकारी आणि कर्मचारी यांनी स्वतःला एकच प्रश्न विचारावा –

माझ्या बँकेला अधिक सुरक्षित, अधिक सक्षम, अधिक विश्वासार्ह आणि अधिक ग्राहकाभिमुख बनविण्यासाठी काय योगदान देत आहे? या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तरच सहकारी बँकेच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पाया ठरणार आहे.

**– व्यंकटेश कुळकर्णी.**

**केंद्र प्रमुख, सहकार भारती सहकार प्रशिक्षण केंद्र.**

# ‘युवा’ बहुउद्देशीय सहकारी संस्था - एकात्मतेतून शाश्वत शक्ती...

**१८ ते ३५ वयोगटातील युवक –युवतीसाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष नुकतेच २०२५ मध्ये साजरे झाले. या वर्षात दूरदृष्टी ठेऊन केलेले नियोजन म्हणजे महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्था निर्माण करण्याचे स्वप्न...! ते कृतीत आले. २०२६ मध्ये १८ ते ३५ वयोगटातील युवक युवतीसाठी हे एक महत्वपूर्ण व्यासपीठ, युवा वर्गाला डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्यादित, पुणे द्वारा पुढाकार घेतला गेला आणि त्यासाठी सहमतीने हा निर्णय कृतीत आला आहे. या अनुषंगाने हा विशेष लेख...**



**सुहास पटवर्धन**
**९४२२० ०४७०१**

**※ महाराष्ट्रातील पहिल्या युवा संस्थेचा पुण्यात शुभारंभ –** १८ ते ३५ वयोगटातील युवक युवतीसाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष नुकतेच २०२५ मध्ये पार पडले. या वर्षात दूरदृष्टी ठेऊन केलेले नियोजन म्हणजे महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्था निर्माण करण्याचे स्वप्न...! ते कृतीत आले, सन २०२६ मध्ये १८ ते ३५ वयोगटातील युवक युवतीसाठी हे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ युवा वर्गाला डोळ्यासमोर ठेवून, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्यादित, पुणे द्वारा पुढाकार घेतला गेला आणि त्यासाठी सहमतीने हा निर्णय कृतीत आणला. भीम बलकवडे या ग्रामीण भागातील तरुणाने मुख्य प्रवर्तक म्हणून जबाबदारी घेतली. महासंघाच्या पदाधिकारी आणि हितचिंतक मंडळींनी पूर्ण सहकार्य केले.

बदलत्या काळात सर्व स्तरातील आणि जातीधर्मातील युवकांनी एकत्र येऊन रोजगार स्वयं रोजगार, व्यवसाय, कौशल्य विकास, बचत, सहकार आणि सामाजिक कार्य या वाटचालीतून स्वतःची आणि आपल्या सहकाऱ्यांची प्रगती साधावी या भावनेतून ‘महाराष्ट्र राज्य युवा बहुउद्देशीय सहकारी संस्था मर्यादित’ ही संस्था सहकार विभागाकडे नोंदणीकृत करण्यात आली. १८ ते ३५ वयोगटातील युवक युवतीसाठी हे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. यात प्रामुख्याने युवक युवतीसाठी स्वयंरोजगार, कौशल्य विकास, व्यवसाय प्रशिक्षण आणि त्यानुसार व्यवसाय संधी, शासकीय योजनांचे मार्गदर्शन, पार्टनरशिप (सामूहिक) व्यवसाय, बचतगट, सहकारी तत्त्वावरील व्यवसाय, डिजिटल सेवा आणि ई-सेवा केंद्र निर्माण, शेतीपूरक तसेच ग्रामीण विकासातील महत्वपूर्ण असा प्रक्रिया उद्योग, गृह निर्माण, आरोग्य आवश्यक आणि सामाजिक उपक्रम, महिला सक्षमीकरण तसेच युवकांना त्यांच्या कौशल्यानुसार प्रेरणा देत व्यवसाय निवड संधी, स्टार्टअप आणि उद्योजकता प्रोत्साहन, सहकारी तत्त्वावरील विविध सेवा प्रकल्प, देशात मनोरंजन क्षेत्र हा मोठा उद्योग बनत असल्याने त्या क्षेत्रातील कौशल्य अंगीकारणे महत्वाचे ठरले आहे. त्या क्षेत्रातील युवक युवतींना प्रकल्प सहाय्य मिळवून देणे आदी घटकांवर लक्ष्य केंद्रित केले आहे.

**※ पार्श्वभूमी... –** भारत हा एकीकडे सर्वाधिक युवकांचा देश आहे आणि दुसरीकडे आयुर्मान वाढल्याने वृद्धांचा देखील देश बनत आहे. माजी केंदीय पर्यावरण आणि उद्योग मंत्री तसेच सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्व असलेल्या सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखालील ४८ सदस्यीय समितीने देशाच्या सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय सहकार धोरण २०२५चा मसुदा तयार केला गेला. हे धोरण २०२५ ते २०४७ या काळातील सहकार क्षेत्राची दिशा आणि दृष्टिकोन निश्चित करण्यासाठी होते. सन २०२३ मध्ये धोरण समितीचा मसुदा केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांना सादर केला होता. त्यावर अभ्यास गटाचे मनन चिंतन झाले. या समितीच्या प्रमुख निष्कर्ष आणि शिफारसीनुसार देशातील युवकांच्या आशा आकांक्षा आणि त्यांचे ध्येय, उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केलेल्या शिफारसी नुसार ‘युवा’ वर्गाला डोळ्यासमोर ठेवलेले होते.

**※ धोरण समितीच्या अभ्यासातील महत्वाचे मुद्दे –**

**• आर्थिक विकास आणि रोजगार निर्मिती –** देशाच्या जीडीपी वाढीमध्ये सहकार क्षेत्राचा वाटा वाढवणे, तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर उपजीविकेची साधने आणि रोजगार निर्माण करणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**• तंत्रज्ञानाचा वापर –** सहकार क्षेत्रात डिजिटायझेशन आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कारभारात पारदर्शकता आणणे. **• कौशल्य विकास आणि प्रशिक्षण –** सहकारी संस्थांमध्ये व्यावसायिकता आणण्यासाठी सदस्यांना व कर्मचाऱ्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाचे धडे देणे.

**• ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण –** शेती, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, गृहनिर्माण आणि पतपुरवठा यांसारख्या विविध क्षेत्रांमधील सहकारी संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. **• राज्यांच्या स्वायत्ततेचे रक्षण –** मसुदा तयार करताना राज्यांच्या स्वायत्ततेचे आणि संघराज्य रचनेचे पूर्णपणे रक्षण केले जाईल, याची दक्षता घेण्यात आली आहे.

**– सुहास पटवर्धन, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी गृह निर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्यादित, पुणे.**

# सहकार भारती पिंपरी चिंचवड महानगर आयोजित कार्यशाळा यशस्वी

**पुणे –** महाराष्ट्र शासनाने वार्षिक अहवाल प्रकटीकरण व प्रसिद्धीकरण या विषयावर एक G. R. (परिपत्रक) काढले आहे. यामुळे शासनाची करडी नजर सर्व संस्था आणि त्यांच्या व्यवहारांवर आहे. चुकीचे व नियमबाह्य व्यवहार आढळल्यास कायदेशीर तसेच दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल असे डॉ. सुधीर दप्तरदार यांनी सांगितले. सहकार भारती पिंपरी चिंचवड महानगर यांच्या वतीने कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेस डॉ. सुधीर दप्तरदार हे व्याख्याते होते. या कार्यशाळेत पिंपरी चिंचवड महानगरातील एकुण २२ ते २३ नागरी पतसंस्थांचे ५५ ते ६० पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

वार्षिक अहवालाचे सादरीकरण कसे असावे अध्यक्षांचे मनोगत विस्तृतपणे कसे करावे या विषयी उत्तम मार्गदर्शन केले. यावेळी सूर्यकांत सुधीर गोफणे यांची पिंपरी चिंचवड सहकार भारती च्या उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. ग्रीव्हज एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप. सोसायटीचे संचालक शिवराज शिंदे यांना गुणवंत कामगार पुरस्कार मिळाला म्हणून




त्यांना सन्मान पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पिंपरी चिंचवड सहकार भारती अध्यक्ष दशरथ जाधव यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

महाराष्ट्र प्रदेश सहकार भारतीचे सहकोषाध्यक्ष औदुंबर नाईक तसेच पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन हरिश्चंद्र ढेकणे महामंत्री यांनी केले.

# नंदुरबार सहकार भारतीच्या वतीने सहकार दिन उत्साहामध्ये साजरा



**नंदुरबार –** सहकार भारती नंदुरबार जिल्हा शाखेतर्फे सहकार दिन साजरा करण्यात आला. येथील पंडित दीनदयाल उपाध्याय पतपेढीच्या कार्यालयात प्रतिमापूजन करण्यात आले. सहकार भारतीचे संस्थापक प्रणेते स्व. लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेस महिला आघाडी प्रमुख सुरेखा वळवी यांनी पुष्पहार अर्पण केला.

सहकार भारती संघटनेचे नंदुरबार जिल्हा संघटनमंत्री महादू हिरणवाळे यांनी सांगितले की, जागतिक सहकार दिन दरवर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या शनिवारी जगभरात साजरा केला जातो. हा दिवस सहकार क्षेत्राचे महत्त्व, त्याद्वारे होणारा सामाजिक आर्थिक विकास आणि शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यातील सहकाराची भूमिका अधोरेखित करण्यासाठी साजरा करण्यात येतो.

सहकार भारतीच्या महिला संघटन प्रमुख वळवी यांनी आगामी काळात सभासद वाढ व सहकार क्षेत्रातील विविध उपक्रम आयोजित करण्याबाबत माहिती सांगितली.

पतपेढीचे अध्यक्ष नानाभाऊ माळी, उपाध्यक्ष मोहन चौधरी, सचिव पांडुरंग माळी जिल्हाध्यक्ष ॲड. के. आर. पाठक, ज्येष्ठ सदस्य प्राचार्य हिम्मतराव चव्हाण, बी. डी. गोसावी, बाबूलाल माळी, वैभव करवंदकर, महिला सदस्या किरण गायकवाड, मीनल परमार, दिपाली नांद्रे, सुदाम खैरनार, प्रसाद अर्थेकर, दरबारसिंग सोलंकी, जयेश मराठे नितीन सांगळे, सुखदेव माळी, भास्कर देवरे, कमलेश कासार आदी उपस्थित होते.

## सहकार भारतीची सहकाराला संस्काराची जोड – रामेश्वर फुंडकर

**अकोला –** सहकार क्षेत्राला संस्काराची महत्त्वपूर्ण जोड देण्याचे कार्य सहकार भारतीच्या वतीने करण्यात येत असल्याचे मत सहकार भारती जिल्हाध्यक्ष रामेश्वर फुंडकर यांनी व्यक्त केले आहे. सहकार भारतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हा महामंत्री जैनेंद्र लुंकड, विधी प्रकोष्ठ रामेश्वर खोंड, सचिव दीपक मापी, तालुका अध्यक्ष कीर्तीकुमार भालका आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीची सुरुवात भारतमाता पूजनाने करण्यात आली. यावेळी तालुका कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. प्रास्ताविक ज्ञानेश देशपांडे यांनी तर सूत्रसंचालन रागिणी किडे आणि आभार संतोष पाठक यांनी मानले. मृण्मयी जोशी यांनी पसायदान सादर केले.

## सहकार सप्ताहाच्या निमित्ताने विविध उपक्रमाचे यशस्वी आयोजन

**नागपूर –** सहकार सप्ताहाच्या निमित्ताने येथील सहकारी संस्था कार्यालयाच्या वतीने विविध जनहिताचे उपक्रम यशस्वीपणाने करण्यात आले. त्यामध्ये पर्यावरण संरक्षण, वृक्ष लागवड, आरोग्य शिबीर, संतुलित आहार त्याचप्रमाणे सहकार खात्याच्या विविध योजनांची माहिती सांगण्यात आली. विभागीय सहनिबंधक सदानंद वुइके तसेच सहकार खात्यातील अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. विविध उपक्रमाच्या माध्यमातून सहकार चळवळीला अधिक बळकटी देण्याचा संकल्प करण्यात आला.

### डॉ. खर्चे लिखित मराठी पुस्तक तेलगू भाषेत रूपांतर

**यवतमाळ –** यवतमाळ अर्बन बँक अध्यक्ष आणि विद्यार्थी परिषदेचे माजी विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. नितिन खर्चे लिखित 'प्रसंगामधून व्यक्त झालेले दीनदयाळ' या मराठी पुस्तकाचे तेलगू भाषेतील पुस्तक आवृत्तीचे नुकतेच डॉ. डी. आर. शर्मा आणि तेलगू साहित्यिक डॉ. श्रीकोंडा रमेश यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकाचे आतापर्यंत हिंदी, कोकणी, तेलगू भाषेत भाषांतर करण्यात आले आहे. पुस्तकाचे अन्य भाषेत भाषांतर करण्यात येणार आहे.

## सहकार भारती नागपूर विभाग बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**हिंगणघाट, वर्धा –** सहकार भारती प्रदेशच्या संस्थागत सदस्य नोंदणीस येत्या १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीत उद्दिष्ट पूर्ण करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. प्रदेश सहकार भारती नागपूर विभागाची बैठक नुकतीच विभाग प्रमुख संजय रोकडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली.

बैठकीत आगामी उपक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. तसेच सदस्य नोंदणीबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी महामंत्री शामकुमार खत्री आणि जिल्हाध्यक्ष प्रभाकर कोळसे तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्थेला पुरस्कार प्रदान

**नागपूर, पुसद –** विदर्भातील उत्कृष्ट कार्याची दखल घेत येथील संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्थेला रिसेल डॉट इन नाशिक संस्थेच्या वतीने विदर्भ रत्न २६ या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आत्माराम जाधव आणि संचालक केशव खासबागे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

सन २००८ मध्ये संस्था स्थापन झाली. सध्या पतसंस्थेच्या यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यात ९ शाखा कार्यरत आहेत. सदस्य संख्या ४७०० असून ठेवीदार संख्या मोठी आहे. गेल्या १५ वर्षापासून संस्थेला 'अ' ऑडिट वर्ग मिळाला आहे. संस्थेच्या वतीने समजतील विविध घटकांसाठी विविध योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत.

### तळोदा अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक संचालकपदी हरिश्चंद्र जोशी

**अकोला, तळोदा –** तळोदा अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालकपदी हरिश्चंद्र जोशी यांची निवड करण्यात आली आहे. निवडीनंतर बँक अध्यक्ष, संचालक, पदाधिकारी यांनी जोशीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. बँकेच्या सध्या तळोदा, नंदुरबार, विसरवाडी, पिंपळनेर आणि शहादा येथे शाखा कार्यरत आहेत.




# सांगली अर्बन बँकेतर्फे चिंतामणराव व्यापार महाविद्यालय येथे वृक्षारोपण

**सांगली –** सांगली अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने चिंतामणराव व्यापार महाविद्यालय येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये आवळा, चिंच, आंबा, कडुलिंब, जांभूळ, फणस या झाडांचा समावेश होता.

बँकेचे अध्यक्ष सीए श्रीपाद खिरे, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष गणेश गाडगीळ, तसेच संचालक, पदाधिकारी, अधिकारी होते. निसर्गाचे संवर्धन ही आजची गरज आहे. वृक्षारोपणातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, असे अध्यक्ष खिरे यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कुंभार यांनी बँकेच्या उपक्रमाचे कौतुक केले. बँकेचे संचालक सीए अनंत मानवी, एच. वाय. पाटील, संजय धामणगावकर, संचालिका स्वाती करंदीकर, सरव्यवस्थापक वासुदेव दिवेकर, उपसरव्यवस्थापक आनंद एकबोटे, वरिष्ठ अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. संदीप कुलकर्णी यांनी आभार मानले. उपक्रम नियोजनात प्रा. आशिष पुराणिक, प्रा. सिंहासने, भास्कर पाटील, सचिन माळी, प्रसाद कुलकर्णी यांचे सहकार्य मिळाले.

# नागरी सहकारी बँकांसाठी आरबीआयचा 'मिशन सक्षम' उपक्रम

**पुणे –** राज्यातील नागरी सहकारी बँकांमधील प्रशासन, जोखीम व्यवस्थापन, हमी अनुपालन, कार्यप्रणाली आणि तंत्रज्ञानाचा अवलंब यांच्यातील त्रुटी दूर होण्याच्या दृष्टीने आरबीआयकडून मिशन सक्षम हा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या मिशनच्या माध्यमातून नागरी सहकारी बँकांच्या विकासाचा पुढील टप्पा सुरक्षित करण्यास तसेच अधिक सक्षम तसेच कौशल्य आणि क्षमता विकसन करण्यास आणि त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

या अभिनव उपक्रमाचा एक भाग म्हणून आरबीआयच्या वतीने प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध भागातील ४५ नागरी सहकारी बँकाचे पदाधिकारी अधिकारी संचालक सहभागी झाले होते. सुशासनाच्या माध्यमातून संचालक मंडळाची परिणामकारकता वाढविणे यावर भर देण्यात आला होता. तसेच योग्य निर्णय, क्षमता, उत्तर दायित्व आणि शाश्वत संस्थात्मक वाढीस चालना देण्यासाठी प्रभावी प्रशासनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणारी आहे यावर भर देण्यात आला.

दिवसभरच्या उपक्रमात सायबर धोका, यापासून संरक्षण, तांत्रिक अद्ययावतीकरण सोपे सुरक्षित कार्यप्रणाली यावर विचारविनिमय करण्यात आला.

# कॉसमॉस सहकारी बँकेला मार्च अखेर ११८.१२ कोटींचा निव्वळ नफा, सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर

**पुणे –** कॉसमॉस सहकारी बँकेने मार्च अखेर ११८ कोटीचा निव्वळ नफा मिळविला आहे. तसेच बँक सदस्यांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेच्या १२० वी वार्षिक सर्वसाधारण सभेत बँक अध्यक्ष सचिन आपटे यांनी ही माहिती सांगितली. बँकेचा एकूण व्यवसाय ४४ हजार कोटी इतका झाला असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अध्यक्ष आपटे यांनी बँकेच्या वार्षिक प्रगतीचा आढावा मांडला. बँकेचा एकूण निधी २,७७८ कोटी इतका आहे.

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेची आर्थिक स्थिती भक्कम राहिली आहे. एकूण ठेवी २६ हजार १३३ कोटी तर कर्ज वाटप १७ हजार ८७९ कोटी इतके करण्यात आले आहे. गुजरातमध्ये बँकेच्या नवीन दहा शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे बँकेच्या एकूण




शाखा १९३ इतक्या झाल्या आहेत. सभेला उपाध्यक्ष डॉ. यशवंत कासार, ज्येष्ठ संचालक आणि माजी अध्यक्ष प्रल्हाद कोकरे तसेच संचालक, अधिकारी, खातेदार उपस्थित होते.

# देवगिरी बँकेच्या संचालक प्रशिक्षण कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर** – देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या संचालक मंडळासाठी आयोजित एकदिवसीय प्रशिक्षण उत्साहात पार पडले. बँकेचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, विभाग प्रमुख तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या प्रगतीत संचालकांची भूमिका, सुशासन आणि जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. पहिल्या सत्रात हिंगोली बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांनी बँकेच्या प्रगतीमध्ये संचालकांचा सहभाग या विषयावर मार्गदर्शन करत प्रभावी नेतृत्त्व, निर्णयक्षमता आणि सहकार क्षेत्रातील बदलत्या आव्हानांवर प्रकाश टाकला तर दुसऱ्या सत्रात बँकिंग तज्ज्ञ जयंत अभ्यंकर यांनी एनपीए व्यवस्थापन यावर मार्गदर्शन करून थकीत कर्ज नियंत्रण, जोखीम व्यवस्थापन आर्थिक शिस्त याविषयी माहिती सांगितली.

दुपारच्या सत्रात कर्ज, ऑडिट, कम्प्लायन्स व ताळेबंद विश्लेषण यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. केशव सृष्टी प्रतिष्ठानचे रत्नाकर पाटील यांनी सेवाकार्यातील अनुभव व बँकेचा सेवा प्रकल्पातील सहभाग यावर मार्गदर्शन केले.

समारोप बँकेचे अध्यक्ष शितोळे यांनी संचालकांनी बँक विषयांचा अभ्यास करून बँकेचे व्यवस्थापन आणि नेतृत्त्व केले पाहिजे. बँकेला वेळ दिलाच पाहिजे. व्यवसाय वाढ करताना सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजोपयोगी सेवाकार्य कसे करता येईल, याचा विचार करावा असे आवाहन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे, रूपेंद्र कोयाळकर उपस्थित होते.

# देवगिरी बँकेला ४१ कोटींचा नफा; सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर




## राजस्थानमध्ये शाखा विस्तार करणार

**छत्रपती संभाजीनगर** – नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात देवगिरी नागरी सहकारी बँकेला ४१ कोटींचा नफा झाला असून सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. बँकेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील बँकेच्या कामगिरीचा सविस्तर आढावा सादर केला.

बँकेची आर्थिक स्थिती अधिक सक्षम असून बँकेला प्राप्त झालेला शेड्युल्ड बँकेचा दर्जा आणि सुरू करण्यात आलेली इंटरनेट बँकिंग सेवा हे बँकेच्या प्रगतीतील महत्त्वाचे टप्पे असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रारंभी बँकेचे सभासद व कर्मचारी यांच्या दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

सभेमध्ये संचालक मंडळाने मांडलेल्या विविध ठरावांना सभासदांनी सर्वानुमते मान्यता दिली. सर्व सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. लाभांशाची रक्कम सभासदांच्या खात्यात तत्काळ जमा करण्यात आली.

महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, महापौर समीर राजूरकर, स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये तसेच सभागृह नेते गोविंद केंद्रे उपस्थित होते. रा. स्व. संघाचे देवगिरी प्रांताचे प्रांत संघचालक अनिल भालेराव, प्रांत कार्यवाह धनंजय धामणे, प्रांत सहकार्यवाह डॉ. रमेश जाधव, ज्येष्ठ सभासद शरद भोगले, माजी संचालक हिम्मतराव गवळी, रघुवीर ओक यांच्यासह विविध क्षेत्रांतील बँकेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्ष शितोळे यांनी बँकेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. व्यवसाय वाढ, आधुनिक बँकिंग सुविधा, डिजिटल सेवा आणि सामाजिक उपक्रमांची माहिती सांगितली. राजस्थानातील सीकर जिल्ह्यात देवगिरी बँकेची नवीन शाखा सुरू करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, आगामी काळात महाराष्ट्रालगतच्या इतर राज्यांमध्येही शाखाविस्तार करण्याचा बँकेचा मानस आहे. सभासदांनी विविध विषयांवर सूचना व प्रश्न उपस्थित केले. त्यास अध्यक्ष शितोळे, ज्येष्ठ संचालक शिवाजीराव शेरकर, अशोक पाटील, प्रशांत देशपांडे आणि ॲड. मुकेश गोयंका यांनी उत्तरे दिली. उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक राजेश जैन, सजनराव मते, जयश्री किवळेकर, प्रशांत देशपांडे, नागनाथ काजळे, ॲड. सागर विद्वांस, प्रा. डॉ. क्षमादेवी खोब्रागडे, डॉ. प्रज्ञा तल्हार, सुरेश जगाडे, व्यवस्थापन मंडळ सदस्य सरदारसिंग बैनाडे यांच्यासह बँकेचे आजी-माजी संचालक, अधिकारी, कर्मचारी सभासद उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी सूत्रसंचालन तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी इतिवृत्ताचे वाचन केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी रूपेंद्र कोयाळकर यांनी आभार मानले.

# बनावट नोटा बाळगणे गंभीर गुन्हा!

डिजिटल फ्रॉड, सायबर क्राईम याबरोबरच बनावट नोटा तयार करणे हा देखील देशाच्या अर्थव्यवस्थेस बाधा आणणारा एक गंभीर गुन्हा मानला जातो. भारतीय दंड संहितेनुसार बनावट नोटांची छपाई करणे, त्यांचा साठा करणे व अशा बनावट नोटा चलनात आणणे, या सर्वच क्रिया अजामीनपात्र गुन्ह्यामध्ये मोडतात व याकरिता गुन्हेगारांना दंडात्मक कारवाईबरोबरच प्रसंगी जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेस देखील सामोरे जावे लागू शकते.



सायली भोईर
सरव्यवस्थापिका
राज्य सहकारी बँक
९३२६७ ७६६१९

बनावट नोटा बनवणाऱ्या टोळ्या देशातच कार्यरत असतात असे नाही. अशा कृत्यात कधीकधी अन्य देशातील संघटना देखील गुंतलेल्या असतात व आपल्या शत्रुदेशातील अर्थव्यवस्था धोक्यात आणण्यासाठी त्या देशातील बनावट नोटा तयार करुन त्या चलनात आणण्याच्या कृत्यात सामिल असतात. या बनावट नोटा हुबेहूब खऱ्या नोटांसारख्याच असतात. त्यामुळे त्यांना ओळखणे कठीण असते.

बनावट नोटा चलनात आल्यावर अनेकदा सामान्य नागरिकही त्याला फसतात व त्यांच्याद्वारा या नोटा स्वीकारल्या जातात आणि नकळत तेही बनावट नोटा व्यवहारात आणण्याच्या कृत्यात सहभागी होत असतात. अशी एखादी बनावट नोट ग्राहकाने आपल्या बँकेत खात्यात जमा करावयास आणल्यास, रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार त्या बनावट नोटेचा कोणताही मोबदला ग्राहकास दिला जात नाही व ती बनावट नोटही ग्राहकाला परत केली जात नाही. शिवाय बँकांना देखील बनावट नोटा परस्पर नष्ट करता येत नाहीत. सदर नोटांवर बँकांना Counterfeit Note असा स्टॅम्प मारुन त्या नोटा वेगळ्या ठेवाव्या लागतात, जेणेकरून त्या पुनश्च चलनात येणार नाहीत. असे न केल्यास संबंधित बँकेचा बनावट नोटा चलनात आणण्यात सहभाग होता, असे मानले जाते व त्या अनुषंगाने बँकेवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

बनावट नोटेची नोंद स्वतंत्र रजिस्टरमध्ये प्रमाणित करून ठेवल्यानंतर त्याची एक सलग अनुक्रमांक असलेली पावती बनवली जाते, त्यावर बँकेचा कॅशिअर व नोट जमा करणाऱ्या व्यक्तीची सही घेण्यात येते जर त्या व्यक्तीने पावतीवर सही करण्यास नकार दिला, तरीही अशी पावती बनवली जाते. ग्राहकासोबत झालेल्या रोखीच्या व्यवहारात जर कॅशिअरला एकाच वेळी एक अथवा चारपर्यंत बनावट नोटा आढळल्यास, बँक अधिकाऱ्यांना एका विशिष्ट नमुन्यात त्याची माहिती स्थानिक पोलिस खात्याला देणे बंधनकारक आहे.

जर एखाद्या रोख व्यवहारात ४ पेक्षा अधिक बनावट नोटा आढळल्यास बँक अधिकाऱ्याकडून त्या नोटा ताबडतोब स्थानिक पोलिस खात्याला किंवा नोडल पोलिस खात्याला पुढील चौकशी व कारवाईसाठी पाठवल्या जातात व त्यासंदर्भात बँक अधिकाऱ्यास एफआयआर म्हणजेच प्रथम खबर अहवाल दाखल करावा लागतो. पोलिस खात्याला बनावट नोटा विहित नमुन्यातील अहवालासहित पाठविल्यास पोलिस अधिकाऱ्यांकडून बँक अधिकाऱ्यांनी त्याची पावती घेणे आवश्यक आहे.

भारतीय न्याय संहिता २०२३ मधील 'काऊंटरफिटिंग' या संज्ञेमध्ये विदेशी चलनाचाही समावेश आहे. तसेच बनावट नोटांकरिता फेक इंडियन करन्सी नोट हा कायदेशीर प्रचलित शब्द आहे. बँकांनी अशा बनावट भारतीय चलनी नोटांची नोंद सीसीआर पोर्टलवर करावी. खऱ्या नोटांची ओळख ग्राहकांनी पटवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने एक सोपी नियमावली जारी केली आहे. खऱ्या नोटा सूर्यप्रकाश किंवा दिव्याच्या प्रकाशाच्या दिशेने धरल्यास एक सुरक्षा धागा जो प्रकट हिरव्या रंगाचा दिसतो, तो निळ्या रंगामध्ये परिवर्तित होताना दिसतो तसेच खऱ्या नोटांवरील महात्मा गांधीची प्रतिमा असलेला वॉटरमार्क व ५०० हा अंक दिसून येतो. ही प्रतिमा अशोक स्तंभ तथा गव्हर्नरची सही स्पर्श केल्यास उठावदार भासते. खऱ्या नोटांची सत्यता पडताळणीसाठी किमान वरील बाबी ग्राहकांनी तपासून घ्याव्यात.

सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात, खऱ्या नोटांची ओळख पटवण्यासाठी बँकांनी अल्ट्रा व्हायलेट मशिन, नोट सॉर्टिंग मशिन, नोट ऑथेंटिकेट मशिन इ. प्रत्येक शाखेत, करन्सी चेस्ट येथे तथा मुख्य कचेरीत ठेवणे अनिवार्य आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या सुचनेनुसार बँकांनी एटीएममध्ये अथवा कॅश काऊंटरवर केवळ अधिकृत नोट चेकिंग मशिनद्वारेच नोटा वितरीत केल्या जात आहेत, याची दक्षता घेणे जरुरीचे आहे. रिझर्व्ह बँकेच्या नोट परतावा नियम, २००९ मध्ये खालील प्रकारच्या नोटांचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) मळलेल्या नोटा २) फाटलेल्या - तुकडे झालेल्या नोटा ३) अतिशय खराब अवस्थेत असलेल्या नोटा ४) जळालेल्या नोटा ५) करपलेल्या नोटा ६) जाणूनबुजून कापलेल्या नोटा. खऱ्या नोटा जर फाटलेल्या, जीर्ण अथवा मळलेल्या स्वरूपात असल्या तरी त्याचा परतावा देण्याच्या सूचना रिझर्व्ह बँकेने सर्वच बँकांना दिल्या आहेत. यामध्ये मळलेल्या नोटा बदलून देण्याची सुविधा बँकांच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असली पाहिजे तर फाटलेल्या नोटा बदलून देण्याची सुविधा बँकांच्या ठराविक शाखांमध्ये उपलब्ध असावी. अशा नोटा आणणारी व्यक्ती बँकेची खातेदार असली अथवा नसली तरी त्या व्यक्तीला नोटा बदलून देण्याचे निर्देश रिझर्व्ह बँकेने जारी केले आहेत.

मळलेल्या नोटांमध्ये सामान्यरीत्या वारंवार वापरामुळे खराब झालेल्या नोटांचाही समावेश होतो. यामध्ये दोन तुकड्यांची एक नोट, जी एकत्र चिटकवलेली असते, तिचाही समावेश होतो. मात्र सदर दोन्ही तुकडे हे एकाच नोटेचे असावेत आणि त्या नोटेचे कोणतेही महत्त्वाचे वैशिष्ट्य नष्ट झालेले नसावे. अशा नोटा ग्राहकांनी सादर केल्यास बँकांनी त्या स्वीकाराव्यात. तथापि त्या नोटा कोणत्याही परिस्थितीत पुनश्च चलनात आणू नयेत. बँकांनी त्या पुढील प्रक्रियेसाठी करन्सी चेस्टमध्ये जमा करुन रिझर्व्ह बँकेकडे मळलेल्या नोटांच्या रेमीटन्सद्वारे पाठवाव्यात.

एखाद्या व्यक्तीने एका दिवसात जास्तीत जास्त २० नोटा किंवा रु. ५००/- पर्यंतच्या मूल्याच्या मळलेल्या नोटा सादर केल्यास बँकेने कोणतेही सेवा शुल्क न आकारता त्या व्यक्तीस नोटा बदलून द्याव्यात. जर एखाद्या व्यक्तीने एका दिवसात २० पेक्षा जास्त नोटा किंवा रु. ५००/- पेक्षा जास्त मूल्याच्या नोटा सादर केल्यास बँक त्या नोटा पावती देऊन स्वीकारू शकते आणि नंतर रक्कम खात्यात जमा करु शकते. मात्र अशा वेळी बँक संबंधित खातेदारास सेवा शुल्क आकारु शकते. फाटलेली नोट म्हणजे जिचा काही भाग गायब असतो किंवा ती दोन पेक्षा अधिक तुकड्यांनी बनलेली असते. रिझर्व्ह बँक नोट परतावा नियमानुसार अशा नोटेचे मूल्य निश्चित करुन रक्कम अदा करण्यात येते. रु. ५० पेक्षा कमी मूल्य असलेली नोट जर फाटलेल्या - खराब अवस्थेत असेल व तिचा सध्याचा भाग जर मूळ अखंड असलेल्या नोटेच्या ५० पेक्षा अधिक क्षेत्रफळाचा असेल, तर त्या नोटेचे पूर्ण मूल्य खातेदारास देण्यात येते. जर नोटेचा भाग हा मूळ अखंड नोटेच्या क्षेत्रफळापेक्षा ५० किंवा त्याहून कमी असेल तर कोणतेही मूल्य त्या फाटलेल्या नोटेकरीता

पुढील पानावर...

# राष्ट्रीय मत्स्य व्यवसाय सहकारी संघ अध्यक्षपदी प्रकाश लोणारे



**नवी दिल्ली** – राष्ट्रीय मत्स्य व्यवसाय सहकारी संघाच्या अध्यक्षपदी प्रकाश लोणारे तर उपाध्यक्षपदी जयश्री गडनाईक यांची नुकतीच निवड करण्यात आली. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

नूतन संचालक याप्रमाणे – मनोज कुमार – दिल्ली, जगपूजन सारनी – उत्तर प्रदेश, श्रीकट्टा लिंगम – तेलंगणा, संजय केवट – बिहार, राजुला देबरमा – त्रिपुरा, राजश्री गढवी – गुजरात, लतीफ अहमद दार – श्रीनगर, एस माडेगौडा – मणीपूर यांची निवड करण्यात आली आहे.

# राजर्षी शाहू सहकारी बँकेच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना अर्थ साहाय्य

**पुणे** – येथील राजर्षी शाहू सहकारी बँकेच्या वतीने सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून मूकबधिर आणि अंध दिव्यांग व्यक्तींना घर आणि व्यावसायिक वाहन खरेदीसाठी अर्थसाहाय्य करण्यात आले. या वेळी चारचाकी वाहनांची किल्ली खातेदारांना सुपूर्द करण्यात आली. बँक अध्यक्ष पद्माकर पवार तसेच पदाधिकारी, संचालक, अधिकारी उपस्थित होते. बँकेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबविले जातात.

# आधुनिक मत्स्यशेती करणे काळाची गरज - जिल्हा मच्छिमार संघ अध्यक्ष मेश्राम

**चंद्रपुर** – सध्याच्या बदलत्या स्थितीमध्ये आधुनिक मत्स्यशेती करणे काळाची गरज असून यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मासे प्रक्रिया उद्योग, बर्फ कारखाने यासारख्या बाबींवर लक्ष देण्याची गरज आहे, असे मत चंद्रपूर जिल्हा मच्छिमार संघ अध्यक्ष यादवराव मेश्राम यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त चंद्रपूर सहकार भारतीच्या वतीने मच्छिमार मेळावा आणि चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा उद्योग केंद्र महाव्यवस्थापक अनमोल कोरे, विदर्भ विभागीय मच्छिमार संघ संचालक प्रभाकर मांढरे उपस्थित होते. या मेळाव्यात शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. तसेच जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सवलती आणि योजना याबाबत माहिती सांगण्यात आली. सूत्रसंचालन जिल्हा मच्छिमार संघाचे संचालक दिवाकर डहारे, तर आभार संजय मारभाते यांनी मानले.

# नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालकपदी कवळे गुरुजी

**नांदेड** – नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली. सहकार क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा विचार करून त्यांची निवड करण्यात आली. बँकिंग क्षेत्रात शिस्त, पारदर्शकता विश्वासार्हता आणि लोकाभिमुख कारभार याची परंपरा त्यांनी निर्माण केली आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

# सहकार व्यवस्थापन पदविका परीक्षेचा निकाल १०० टक्के जाहीर

**कोल्हापूर** – येथील दिलासा सामाजिक विश्वस्त संस्था केंद्राच्या सहकार व्यवस्थापन पदविका डीसीएम परीक्षेचा निकाल १०० टक्के जाहीर झाला आहे. परीक्षेसाठी २३ विद्यार्थी बसले होते. त्यातील ७ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक तर ८ विद्यार्थ्यांनी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले आहेत. केंद्र संयोजक डॉ. रूपा शहा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मागील पानावरून...

# बनावट नोटा बाळगणे गंभीर गुन्हा!

अदा केले जात नाही.

रु. ५० किंवा त्यापेक्षा जास्त मूल्य असलेल्या फाटलेल्या नोटेचा सध्याचा अखंड भाग जर सदर मूल्याच्या मूळ नोटेच्या क्षेत्रफळापेक्षा ४० पेक्षा कमी असेल तर अशा नोटेचे कोणतेही मूल्य संबंधितांना अदा केले जात नाही. जर असा भाग मूळ नोटेच्या क्षेत्रफळाच्या ४० ते ८० दरम्यान असेल तर अशा नोटेचे अर्धे मूल्य अदा करण्यात येते. मात्र जर असा भाग मूळ नोटेच्या क्षेत्रफळाच्या ८० पेक्षा जास्त असेल तर अशा नोटेचे पूर्ण मूल्य अदा केले जाते. जर एकाच नोटेचे दोन तुकडे झाले असल्यास, प्रत्येक तुकड्याचे क्षेत्रफळ मूळ नोटेच्या ४० किंवा त्यापेक्षा जास्त असले, तरीही अशा नोटेचे पूर्ण मूल्य अदा करण्यात येते.

फाटलेल्या नोटेचे मूल्य अदा केल्यानंतर बँक अधिकाऱ्यांनी सदरहू नोटेवर PAY / PAID / REJECT असा शिक्का मारून त्यालगत त्या दिवसाची तारीख व स्वत:ची सही करणे आवश्यक राहील. तसेच अशा नोटा पुन्हा चलनात येणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. अशा नोटा चलनात पुन्हा आल्यास त्या नोटेचे कोणतेही मूल्य रिझर्व्ह बँक नोट परतावा नियम, २००९ मधील नियम ६(२) अन्वये संबंधितांना अदा केले जाणार नाही. त्याचप्रमाणे ज्या नोटा अत्यंत ठिसूळ झालेल्या आहेत किंवा जळलेल्या/करपलेल्या किंवा एकमेकांना अशा प्रकारे चिकटलेल्या आहेत की त्या सामान्य परिस्थितीत देखील हाताळल्या जाऊ शकत नाहीत, अशा नोटा बँकेच्या शाखांकडून स्वीकारल्या जाणार नाहीत. अशा परिस्थितीत संबंधित व्यक्तीने रिझर्व्ह बँकेच्या संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून तेथे नोटा सादर कराव्यात. या कार्यालयात त्या नोटेसंदर्भात योग्य तो निर्णय अथवा मूल्यांकन करण्यात येते.

बँकांनी ग्राहकांना नोटा आणि नाणी बदलून देण्याची सुविधा देणे बंधनकारक आहे, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१) कोणतीही बँक ग्राहकाने सादर केलेल्या लहान मूल्याच्या नोटा किंवा नाणी स्वीकारण्यास नकार देऊ शकत नाही. २) ग्राहकाने मागणी केल्यास सर्व मूल्याच्या नवीन/चांगल्या दर्जाच्या नोटा व नाणी त्यास अदा करण्यात यावी. ३) खराब झालेल्या / मळलेल्या फाटलेल्या तसेच सदोष नोटांचा देखील नियमानुसार परतावा देण्यात यावा. ४) केंद्र सरकारने वेळोवेळी जारी केलेली ५० पैसे, रु.१, रु.२, रु.५, रु.१० व रु.२० या मूल्यातील विविध आकाराची नाणीदेखील वैध चलन म्हणून ग्राह्य धरली जातील.

**– सायली संजय भोईर,**
**सरव्यवस्थापिका, दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक**

*****

# सहकारी पतसंस्था शाखा कार्यक्षेत्र वाढीसाठी परवानगी प्रक्रिया सुलभ होणार

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि सहकार भारती संयुक्त बैठक

**मुंबई** – सहकारी पतसंस्थांच्या शाखा विस्तार व कार्यक्षेत्र वाढीसाठी परवानगी प्रक्रिया सुलभ व जलद करण्यात येणार आहे, महाराष्ट्रातील बंद पडलेल्या सहकारी बँकांच्या उर्वरित कर्जवसुलीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येईल. तसेच लिक्विडेटरचा कालावधी निश्चित करण्यात येणार आहे. तसेच सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत आवश्यक सुधारणा करण्यात येतील. तसेच निवडणुकीनंतर उर्वरित निधी संबंधित संस्थेला तातडीने परत करण्यात येईल, असे विविध निर्णय येथील मंत्रालयात झालेल्या संयुक्त बैठकीत घेण्यात आले.




राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सहकार क्षेत्रातील विविध प्रश्न व धोरणात्मक विषयांवर सहकार भारतीच्या पदाधिकाऱ्यांसोबत नुकतीच बैठक झाली. सहकार सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे तसेच अपर सचिव संतोष पाटील तसेच सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, उपाध्यक्ष मधुसूदन पाटील, प्रदेश सहसंघटन प्रमुख प्रवीण बुलाख, प्रदेश सचिव भूषण पैठणकर तसेच मुंबई अध्यक्ष राहुल पाटील उपस्थित होते.

महामंत्री जुगादे यांनी सहकारी पतसंस्था, सहकारी बँका आणि इतर सहकारी संस्थांशी संबंधित विविध प्रश्न शासनासमोर मांडले. त्यावर सहकार मंत्री, सहकार सचिव, सहकार आयुक्त व अपर सचिव यांनी सकारात्मक प्रतिसाद देत अनेक विषयांवर त्वरित निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. काही मागण्यांबाबत तत्काळ निर्णयही घेण्यात आले.

**⁂ बैठकीतील निर्णय पुढीलप्रमाणे –**

१) अंशदान प्रणालीवर फेरविचार करून ती Risk-Based Premium पद्धतीने लागू करण्याबाबत सकारात्मक भूमिका तसेच संस्थांच्या अ, ब, क वर्गवारीनुसार अंशदान निश्चित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. २) कलम १०१ अंतर्गत दाखला त्वरित उपलब्ध करून देण्यात येईल.

३) कलम १५६ अंतर्गत अधिकारांचा कालावधी तीन वर्षे करण्यात येणार आहे. ४) कर्जवसुली प्रक्रिया गतिमान करण्यासाठी जिल्हाधिकारी, तहसीलदार व पोलीस प्रशासनाचा प्रभावी समन्वय शासनामार्फत करण्यात येईल.

५) नवीन मॉडेल उपविधींना तातडीने मंजुरी देण्यात येईल. ६) सहकारी बँकांमध्ये पतसंस्थांच्या अडकलेल्या ठेवींबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल. ७) नियमक मंडळाने निश्चित केलेले ठेवी व कर्जावरील व्याजदर मल्टीस्टेट सोसायट्यांनाही बंधनकारक करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. ८) नियमक मंडळ अधिक सक्षम करून पतसंस्थांच्या व्यापक हितासाठी प्रभावीपणे कार्य केले जाईल. ९) सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत आवश्यक सुधारणा करण्यात येतील. १०) निवडणुकीनंतर उर्वरित निधी संबंधित संस्थेला तातडीने परत करण्यात येईल.

११) सहकार खात्याच्या कार्यालयांमध्ये सहकारी संस्थांच्या प्रकरणांचा त्वरित निपटारा करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्यात येईल. १२) शासकीय कार्यालयांची कार्यगती वाढविण्यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने करण्यात येतील. कर्मचारी पतसंस्थांच्या विविध समस्या व प्रलंबित प्रश्नांवर त्वरित तोडगा काढण्यात येईल.

बैठकी दरम्यान सहकार भारतीने मांडलेल्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार भारतीच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

## धरमपेठ महिला सोसायटी संस्थापक किशोर बावणे यांचे निधन



**नागपूर** – येथील दि धरमपेठ महिला मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटीचे संस्थापक किशोर बावणे यांचे नुकतेच निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्यामागे पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे.

३२ वर्षांपूर्वी त्यांनी महिलांना संघटित करून सोसायटीची स्थापना केली आणि कमी कालावधीत सोसायटीने नावलौकिक मिळविला. संस्थेची वार्षिक उलाढाल २३०० कोटींपेक्षा अधिक आहे. संस्थेच्या शाखा महाराष्ट्रासह अन्य राज्यांत कार्यरत आहेत. अनेक गरजू व्यक्तींना संस्थेने आर्थिक मदतीचा हात दिला असून त्यांचे जीवनमान उंचावण्याचे काम केले आहे. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीपणाने राबविले आहेत.

## श्री दत्तात्रय अर्बन मल्टिस्टेट सोसायटी आयोजित प्रशिक्षण वर्ग यशस्वी



**अकोला** – येथील श्री दत्तात्रय अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या वतीने नुकतेच प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध सहकारी पतसंस्थांचे अधिकारी, शाखा व्यवस्थापक आणि कर्मचारी सहभागी झाले होते. सहकार भारती जिल्हाध्यक्ष रामेश्वर फुंडकर, जिल्हा महामंत्री जैनेंद्र लुंकड, संस्थापक अध्यक्ष जगदीश मुरूमकर, केंद्रीय संचालक शाम मते उपस्थित होते.

सहकार चळवळीची मूल्ये, सेवा, शिस्तबद्ध प्रशासन, पारदर्शक कामकाज याबाबत माहिती फुंडकर यांनी सांगितली. अमोल सपकाळ, उद्धव गावंडे, बी. जी. काळे यांनी मार्गदर्शन केले. मुरूमकर यांनी समारोप केला आणि सहकार क्षेत्रात समर्पित भावनेने काम करण्याचे आवाहन केले.

# सहकारी बँकांचे गव्हर्नन्स : राज्य कायदा की केंद्रीय नियमन?

सहकारी बँका या भारताच्या वित्तीय व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण घटक आहेत. ग्रामीण, निमशहरी आणि शहरी भागातील लाखो सभासद, ठेवीदार, शेतकरी, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांचा आधार या संस्थांवर आहे. त्यामुळे सहकारी बँकांचे व्यवस्थापन केवळ सहकार तत्त्वांवर आधारित न राहता सुरक्षित, पारदर्शक, उत्तरदायी आणि सक्षम बँकिंग व्यवस्थेच्या निकषांनुसार असणे आवश्यक ठरते.



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

बँकिंग नियमन (सुधारणा) अधिनियम, २०२० नंतर सहकारी बँकांवरील भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक अधिकारांना अधिक बळकटी मिळाली. त्यानंतर संचालकांची पात्रता, कमाल कार्यकाळ, Fit and Proper निकष आणि संचालक मंडळाच्या सुशासना संदर्भातील केंद्रीय कायदेशीर व नियामक तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित होती. तथापि, या विषयांवर विविध राज्यांमध्ये कायदेशीर व घटनात्मक चर्चा सुरू असून, केंद्रीय तरतुदी, राज्य सहकार कायदे आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांबाबत काही प्रमाणात कायदेशीर अनिश्चितता आणि व्यवहार्य संभ्रम निर्माण झाला आहे. हा प्रश्न केवळ संचालकांच्या निवडणुकीपुरता मर्यादित नसून, भारतीय राज्यघटना, बँकिंग नियमन अधिनियम, १९४९, भारतीय रिझर्व्ह बँकेचे वैधानिक अधिकार आणि सर्वोच्च न्यायालयाने विकसित केलेल्या घटनात्मक तत्त्वांशीही संबंधित आहे.

या लेखामध्ये उपलब्ध घटनात्मक, वैधानिक आणि न्यायालयीन संदर्भाचा अभ्यास करून सहकारी बँकांमधील संचालकांची पात्रता, कार्यकाळ आणि बँकिंग गव्हर्नन्स या विषयाचा संतुलित व कायदेशीर दृष्टिकोनातून विचार करण्याचा प्रयत्न केला आहे.

**※ घटनात्मक चौकट आणि सहकारी बँकांचे दुहेरी स्वरूप –**

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २४६ आणि सातव्या अनुसूचीद्वारे (Seventh Schedule) संसद आणि राज्य विधानमंडळ यांच्यात कायदे करण्याच्या अधिकारांची स्पष्ट विभागणी करण्यात आली आहे. या विभागणीनुसार Union List (केंद्रीय सूची) मधील विषयांवर कायदे करण्याचा विशेष अधिकार संसदेला आहे, तर State List (राज्य सूची) मधील विषयांवर संबंधित राज्य विधानमंडळाला अधिकार आहे.

Union List Entry ४५ अंतर्गत बँकिंग (Banking) हा विषय पूर्णपणे संसदेच्या अधिकारक्षेत्रात येतो. त्यामुळे बँकिंग व्यवसाय, बँकिंग नियमन, संचालक मंडळाचे सुशासन (Board Governance -), योग्य व पात्रतेचे निकष (Fit and Proper Criteria A), विवेकपूर्ण बँकिंग मानके (Prudential Norms – विवेकपूर्ण बँकिंग मानके), ठेवीदारांचे संरक्षण (Depositor Protection -) आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे नियमन या सर्व बाबी केंद्रीय कायद्याच्या कक्षेत येतात. याउलट State List Entry ३२ अंतर्गत सहकारी संस्थांची नोंदणी, सभासदत्त्व, निवडणूक प्रक्रिया, संचालक मंडळाची स्थापना, सर्वसाधारण सभा आणि संस्थात्मक प्रशासन या बाबी राज्याच्या विधिमंडळीय अधिकार क्षेत्रात येतात.

सहकारी बँकांवर दुहेरी नियामक नियंत्रण (Dual Regulation) लागू होते. एका बाजूला त्यांच्या स्थापना, नोंदणी, सदस्यत्व, निवडणूक प्रक्रिया आणि संस्थात्मक प्रशासनावर केंद्रीय / राज्य सहकार कायदा लागू होतो; तर दुसऱ्या बाजूला बँकिंग व्यवसाय, वित्तीय शिस्त, ठेवीदारांचे हितसंरक्षण, विवेकपूर्ण बँकिंग मानके ( Prudential Norms), संचालक मंडळाचे सुशासन आणि नियामक देखरेख यांवर बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेचे वैधानिक अधिकार लागू होतात. त्यामुळे सहकारी बँकांच्या व्यवस्थापनात केंद्रीय राज्य सहकार कायदा आणि बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ यांचा समन्वय साधणे आवश्यक ठरते.

यावरून एक मूलभूत बाब स्पष्ट होते की, संचालकांच्या निवडणुकीची प्रक्रिया, मतदारसंघ, मतदान, उमेदवारी अर्ज, निवडणूक कार्यक्रम आणि निवडणुकीचे प्रशासन या बाबी केंद्रीय राज्य सहकार कायद्याच्या कक्षेत येतात. मात्र, संचालक म्हणून निवडून येण्यासाठी आवश्यक पात्रता, अपात्रता, कमाल कार्यकाळ, Fit and Proper निकष, संचालक मंडळाचे सुशासन (Board Governance) आणि बँकिंग गव्हर्नन्स या बाबींचा संबंध प्रत्यक्षात बँकिंग नियमनाशी अधिक निकट आहे. त्यामुळे या विषयांचा विचार करताना केवळ केंद्रीय राज्य सहकार कायद्यापुरता मर्यादित न राहता, भारतीय राज्यघटनेतील अधिकारविभागणी, बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक चौकटीचाही एकत्रित विचार करणे आवश्यक ठरते.

**※ बँकिंग नियमन कायदा १९४९ आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे वैधानिक अधिकार –**

बँकिंग नियमन कायदा १९४९ हा भारतातील बँकिंग व्यवसायाचे नियमन करणारा प्रमुख केंद्रीय कायदा आहे. भारतीय राज्यघटनेतील Union List Entry 45 अंतर्गत संसदेने हा कायदा संमत केला असून, सुरक्षित, सक्षम आणि उत्तरदायी बँकिंग व्यवस्था निर्माण करणे, ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करणे आणि वित्तीय स्थैर्य, टिकविणे हा त्यामागील मूलभूत उद्देश आहे. या कायद्यातील Section ५६मुळे बँकिंग नियमन कायदा १९४९ कायद्यामधील लागू तरतुदी सहकारी बँकांनाही लागू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सहकारी बँका या बँकिंग व्यवसायाच्या संदर्भात भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक चौकटीच्या अधीन राहतात.

याच कायद्यातील कलम १० (अ) ही तरतूद सक्षम, अनुभवी आणि संतुलित संचालक मंडळाची रचना करण्यावर भर देते. या तरतुदीचा उद्देश केवळ संचालकांची निवड करणे नसून, बँकेचे व्यवस्थापन सक्षम, व्यावसायिक आणि उत्तरदायी राहावे हा आहे. त्यामुळे संचालक मंडळाचे सुशासन हे बँकिंग व्यवस्थेचे अविभाज्य अंग मानले जाते.

कलम ३५ (अ) अंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँकेला सार्वजनिक हित, ठेवीदारांचे संरक्षण आणि बँकिंग व्यवस्थेची सुरक्षितता यासाठी बंधनकारक निर्देश जारी करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. सहकारी बँकांसह सर्व संबंधित बँकांनी अशा निर्देशांचे पालन करणे कायदेशीरदृष्ट्या आवश्यक असते.

तसेच, बँकिंग नियमन अधिनियम, १९४९मधील कलम ३६एसी (Section 36AC) आणि कलम ३६ एसीए (Section 36ACA) या तरतुदी सहकारी बँकांच्या व्यवस्थापनासंदर्भात भारतीय रिझर्व्ह बँकेचे नियामक अधिकार अधोरेखित करतात. या तरतुदींनुसार, कायद्यात नमूद केलेल्या परिस्थितीत संचालक मंडळाबाबत आवश्यक नियामक उपाययोजना करणे, त्यामध्ये हस्तक्षेप करणे किंवा इतर वैधानिक कारवाई करण्याचे अधिकार भारतीय रिझर्व्ह बँकेला प्रदान करण्यात आले आहेत.

यावरून हे स्पष्ट होते की, सहकारी बँकेचे संचालक मंडळ हे केवळ निवडून आलेले प्रतिनिधींचे मंडळ नसून, ठेवीदारांचा विश्वास, बँकेची वित्तीय स्थिरता आणि सुरक्षित बँकिंग व्यवस्था यांची जबाबदारी स्वीकारणारी एक नियामकदृष्ट्या उत्तरदायी संस्था आहे. म्हणूनच संचालकांची पात्रता, कार्यकाळ आणि गव्हर्नन्स या विषयांचा विचार करताना केवळ

**पुढील पानावर...**

सहकार कायद्यापुरता विचार न करता बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक भूमिकेचा एकत्रित विचार करणे आवश्यक ठरते.

**⁂ दहा वर्षांच्या कार्यकाळाचा प्रश्न : गव्हर्नन्स की निवडणूक?**

सध्या सर्वाधिक चर्चेत असलेला मुद्दा म्हणजे सहकारी बँकांच्या संचालकांच्या कमाल दहा वर्षांच्या कार्यकाळाचा आहे. या प्रश्नाकडे पाहताना प्रथम हे समजून घेणे आवश्यक आहे की, हा विषय केवळ निवडणूक प्रक्रियेचा आहे की बँकिंग गव्हर्नन्सचा?

या प्रश्नाचा केंद्रबिंदू निवडणूक नसून संचालक मंडळाचे सुशासन (Board Governance) हा आहे. कोणत्याही बँकेचे संचालक मंडळ हे केवळ प्रतिनिधिक स्वरूपाचे नसते; ते बँकेची धोरणात्मक दिशा निश्चित करणारे, जोखीम व्यवस्थापनावर देखरेख ठेवणारे, नियामक अनुपालन सुनिश्चित करणारे आणि ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करणारे सर्वोच्च व्यवस्थापन मंडळ असते.

दहा वर्षांच्या कमाल कार्यकाळामागील उद्देश कोणत्याही व्यक्तीला निवडणूक लढविण्यापासून प्रतिबंध करणे हा नसून, नेतृत्वात नियोजित परिवर्तन (Leadership Rotation). सत्तेचे दीर्घकालीन केंद्रीकरण टाळणे, हितसंबंधांचा संघर्ष कमी करणे. अधिक व्यावसायिक आणि उत्तरदायी संचालक मंडळ निर्माण करणे तसेच बँकेवरील ठेवीदारांचा विश्वास दृढ ठेवणे हा आहे. म्हणूनच संचालकांच्या कार्यकाळावरील मर्यादा ही निवडणूक प्रक्रियेपेक्षा बँकिंग गव्हर्नन्सचा एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून पाहणे अधिक सुसंगत वाटते.

**⁂ सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि त्यांचे महत्त्व –**

सहकारी बँकांच्या संदर्भातील अधिकार विभागणी समजून घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेले काही महत्त्वाचे निर्णय मार्गदर्शक ठरतात.

R.C. Cooper v. Union of India (१९७०) या ऐतिहासिक निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने बँकिंग या विषयाचा व्यापक अर्थ स्पष्ट केला. बँकिंग म्हणजे केवळ ठेवी स्वीकारणे किंवा कर्जवाटप करणे एवढेच नसून त्यामध्ये बँकिंग व्यवस्थापन, नियंत्रण, नियमन आणि वित्तीय स्थैर्य यांचाही समावेश होतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे बँकिंग या विषयावर संसदेचा अधिकार व्यापक असल्याचे या निर्णयातून अधोरेखित झाले.

त्यानंतर Greater Bombay Co-operative Bank Ltd. v. United Yarn Tex (P) Ltd. (2007) 6 SCC 236 या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की, सहकारी बँका या सहकारी संस्था असल्या तरी त्या बँकिंग व्यवसाय करीत असल्यामुळे बँकिंग विषयांमध्ये संसदेने केलेल्या कायद्यांचे प्राधान्य राहते. या निर्णयामुळे राज्य सहकार कायदा आणि केंद्रीय बँकिंग कायदा यांच्यातील घटनात्मक सीमा अधिक स्पष्ट झाली.

Pandurang Ganpati Chaugule v. Vishwasrao Patil Murgud Sahakari Bank Ltd. (2020) 9 SCC 215 या निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा स्पष्ट केले की, सहकारी बँकांचा बँकिंग व्यवसाय हा Union List Entry 45 मधील बँकिंग या विषयाशी संबंधित आहे. परिणामी, भारतीय रिझर्व्ह बँकेचे नियामक अधिकार आणि बँकिंग नियमन कायदा यांचे सहकारी बँकांवरील महत्त्व अधोरेखित झाले.

या सर्व निर्णयांचा एकत्रित विचार करता असे दिसून येते की, सहकारी बँकांच्या संस्थात्मक रचनेवर राज्य कायदा लागू होत असला, तरी बँकिंग व्यवसाय, नियमन आणि गव्हर्नन्सच्या बाबतीत केंद्रीय कायद्याचे स्थान अधिक महत्त्वाचे आहे.

**⁂ घटनात्मक कायदेशीर तत्त्वांचा परिणाम –**

सहकारी बँकांशी संबंधित या प्रश्नाचा विचार करताना केवळ कायद्याच्या शब्दांकडे पाहून निर्णय देता येत नाही. न्यायालयांनी विकसित केलेली काही मूलभूत घटनात्मक तत्त्वे येथे महत्त्वाची ठरतात.

मुख्य गाभा किंवा सारतत्त्व (Pith and Substance) या तत्त्वानुसार कोणत्याही कायद्याचा किंवा तरतुदीचा वास्तविक उद्देश कोणत्या विषयाशी संबंधित आहे, हे प्रथम पाहिले जाते. संचालकांचा कमाल सलग कार्यकाळ हा निवडणूक प्रक्रियेपेक्षा संचालक मंडळाचे सुशासन आणि बँकिंग व्यवस्थापनाशी अधिक संबंधित असल्यास, त्याचा विचार Banking या विषयाच्या चौकटीत करणे अधिक सुसंगत ठरू शकते.

व्याप्त किंवा व्यापलेले क्षेत्र (Occupied Field) या तत्त्वानुसार एखाद्या विषयावर संसदेने व्यापक कायदेशीर चौकट निर्माण केली असल्यास त्याच क्षेत्रात राज्य कायदा केंद्रीय कायद्याशी विसंगत राहू शकत नाही. बँकिंग नियमन हे अशाच स्वरूपाचे क्षेत्र असल्याचे अनेक न्यायनिर्णयांत नमूद करण्यात आले आहे.



सामंजस्यपूर्ण अर्थ लावणे (Harmonious Construction) या तत्त्वानुसार दोन कायद्यांमध्ये संघर्ष असल्याचे गृहीत न धरता त्यांचा सुसंगत अर्थ लावला पाहिजे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया राज्य सहकार कायद्याने नियंत्रित होत असली, तरी संचालकांची पात्रता, कार्यकाळ आणि बँकिंग गव्हर्नन्स या बाबी Banking Regulation Act च्या चौकटीत समजणे शक्य आहे.

विशेष कायदा सामान्य कायद्यावर प्राधान्याने लागू होतो. (Generalia Specialibus Non Derogant) या तत्त्वानुसार बँकिंग विषयासाठी बँकिंग नियमन कायदा हा विशेष केंद्रीय कायदा असल्याने त्या विषयात त्याला अग्रक्रम प्राप्त होतो.

उद्देशाधारित अर्थ लावणे (Purposive Interpretation) या तत्त्वानुसार कायद्याचा अर्थ केवळ शब्दशः न लावता त्यामागील उद्देश लक्षात घेऊन लावला जातो. संचालकांच्या कार्यकाळावरील मर्यादेचा उद्देश सत्तेचे केंद्रीकरण टाळणे, नेतृत्वात परिवर्तन घडविणे, पारदर्शकता वाढविणे आणि ठेवीदारांचे हित जपणे हा असल्यामुळे त्या तरतुदीचाही अर्थ त्याच उद्देशाशी सुसंगत लावणे अपेक्षित आहे.

तसेच संघीय सर्वोच्चता (Federal Supremacy) या घटनात्मक संकल्पनेनुसार Union List मधील विषयांवर संसदेचा कायदा प्रभावी राहतो. त्यामुळे बँकिंगविषयक बाबींमध्ये केंद्रीय कायदा आणि भारतीय रिझर्व्ह बँकेचे निर्देश यांना विशेष घटनात्मक महत्त्व प्राप्त होते.

**⁂ सध्याचा वाद : कायदेशीर आणि व्यावहारिक वास्तव –**

आज अनेक राज्यांमध्ये या विषयावर संभ्रमाचे वातावरण आहे. काही राज्यांनी केंद्रीय बँकिंग कायदे आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक चौकटीशी सुसंगत राहण्यासाठी आवश्यक प्रशासकीय किंवा कायदेशीर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे; तर काही ठिकाणी या संदर्भातील स्पष्टता किंवा आवश्यक उपाययोजना अद्याप अपेक्षित आहेत. परिणामी, संचालकांची पात्रता, Fit and Proper निकष, कमाल सलग कार्यकाळ आणि संचालक मंडळाच्या सुशासनाबाबत विविध प्रकारच्या कायदेशीर व्याख्या आणि अंमलबजावणीची स्थिती दिसून येते. हा प्रश्न केवळ कायद्याचा नसून तितकाच व्यावहारिकही आहे. सहकारी क्षेत्र, निवडणूक प्रक्रिया, स्थानिक नेतृत्व, संस्थात्मक सातत्य आणि बँकिंग नियमन यांचा परस्पर संबंध असल्यामुळे या विषयाला व्यापक घटनात्मक व प्रशासकीय संदर्भ प्राप्त होतो.

अशा परिस्थितीत केवळ राज्य सहकार कायद्याच्या तरतुदींवर भर देऊन केंद्रीय बँकिंग कायद्याकडे दुर्लक्ष करणे किंवा याउलट राज्य सहकार

**पुढील पानावर...**

# सहकारी बँकांचे गव्हर्नन्स....

कायद्याला पूर्णपणे बाजूला ठेवून केवळ केंद्रीय कायद्याच्या आधारे निर्णय घेणे, या दोन्ही टोकाच्या भूमिका घटनात्मकदृष्ट्या किंवा व्यवहार्यदृष्ट्या योग्य वाटत नाहीत. अधिक योग्य मार्ग म्हणजे दोन्ही कायद्यांचा सामंजस्यपूर्ण व घटनासुसंगत अर्थ (Harmonious Construction) स्वीकारणे. भारतीय राज्यघटनेची रचना केंद्र व राज्य यांच्यात संघर्ष निर्माण करण्यासाठी नव्हे, तर त्यांच्या अधिकारांचे समन्वित वाटप आणि परस्परपूरक कार्यपद्धती सुनिश्चित करण्यासाठी करण्यात आली आहे.



उपलब्ध घटनात्मक तरतुदी, बँकिंग नियमन अधिनियम, १९४९, भारतीय रिझर्व्ह बँकेचे वैधानिक अधिकार, सर्वोच्च न्यायालयाने विकसित केलेली घटनात्मक तत्त्वे आणि बँकिंग गव्हर्नन्सची मूलभूत तत्त्वे यांचा एकत्रित विचार करता, सहकारी बँकांच्या संचालकांची पात्रता, Fit and Proper निकष, संचालक मंडळाचे सुशासन आणि कमाल सलग कार्यकाळ या बाबी केवळ निवडणूक प्रक्रियेपुरत्या मर्यादित नसून बँकिंग नियमनाशी थेट संबंधित आहेत.

त्याचवेळी, सहकारी संस्थांची स्थापना, सभासदत्त्व, निवडणूक प्रक्रिया, सर्वसाधारण सभा आणि संस्थात्मक प्रशासन या बाबींमध्ये केंद्रीय राज्य सहकार कायद्याचे स्वतंत्र महत्त्व कायम राहते. त्यामुळे या विषयाकडे राज्य कायदा विरुद्ध केंद्रीय कायदा अशा संघर्षाच्या दृष्टिकोनातून न पाहता, केंद्रीय राज्य सहकार कायदा आणि बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ यांच्यातील घटनात्मक सुसंगती व परस्परपूरकता या दृष्टिकोनातून पाहणे अधिक योग्य ठरेल. अशा समन्वित दृष्टिकोनामुळे अंमलबजावणीत अधिक स्पष्टता निर्माण होईल, अनावश्यक न्यायालयीन वाद कमी होतील आणि देशभरातील सहकारी बँकांमध्ये अधिक सुसंगत, सक्षम आणि विश्वासार्ह बँकिंग गव्हर्नन्स विकसित होण्यास मदत होईल.

माझ्या मते, भारतीय रिझर्व्ह बँक, भारत सरकार, संबंधित राज्य सरकारे आणि सहकार विभाग यांनी समन्वयाने या विषयावर स्पष्ट, एकसमान आणि व्यवहार्य मार्गदर्शक भूमिका निश्चित करणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार केंद्रीय राज्य सहकार कायद्यांमध्ये सुसंगत दुरुस्ती करून त्यांचा बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियामक चौकटीशी समन्वय साधणे ही काळाची गरज आहे.

आज सहकारी बँकांसमोरील प्रमुख आव्हान केवळ संचालकांचा कार्यकाळ किंवा निवडणूक प्रक्रिया नसून, सक्षम संस्थात्मक सुशासन, व्यावसायिक व्यवस्थापन, वित्तीय शिस्त, ठेवीदारांचा विश्वास आणि संस्थेची दीर्घकालीन स्थिरता हे आहे. त्यामुळे संचालकांच्या कार्यकाळावरील मर्यादेचा प्रश्न केवळ निवडणूक प्रक्रियेपुरता मर्यादित नसून, Fit and Proper निकष, संचालक मंडळाचे सुशासन आणि ठेवीदारांच्या हितसंरक्षणाशी संबंधित आहे.

सहकारी बँका या सहकारी संस्था असतानाच बँकिंग व्यवसायही करतात. त्यामुळे त्यांच्यावर केंद्रीय राज्य सहकार कायदे आणि बँकिंग नियमन अधिनियम, १९४९ हे दोन्ही कायदे लागू होतात. सहकार कायदे संस्थात्मक प्रशासन नियंत्रित करतात, तर बँकिंग नियमन अधिनियम आणि भारतीय रिझर्व्ह बँकेची नियामक चौकट बँकिंग गव्हर्नन्स, संचालकांची पात्रता, विवेकपूर्ण बँकिंग मानके आणि ठेवीदारांच्या हितसंरक्षणाशी संबंधित बाबी नियंत्रित करतात. म्हणून या दोन्ही कायद्यांचा सामंजस्यपूर्ण व घटनासुसंगत अर्थ (Harmonious Construction) स्वीकारणे अधिक उचित ठरेल.

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २४६, सातव्या अनुसूचीतील Union List Entry 45, बँकिंग नियमन अधिनियम, १९४९, भारतीय रिझर्व्ह बँकेचे वैधानिक अधिकार आणि सर्वोच्च न्यायालयाने विकसित केलेली घटनात्मक तत्त्वे यांचा एकत्रित विचार केल्यास, बँकिंग गव्हर्नन्ससंबंधी केंद्रीय नियमनाचे महत्त्व स्पष्ट होते. त्याचवेळी, कायदा निर्माण करण्याचा अधिकार विधिमंडळाचा असून, त्याचा घटनासुसंगत अर्थ लावणे आणि घटनात्मक वैधता तपासणे ही न्यायालयाची भूमिका आहे. त्यामुळे आवश्यक विधायी स्पष्टता आणि नियामक सुसंगती निर्माण करण्याची जबाबदारी विधिमंडळ व नियामक संस्थांचीच आहे.

सहकारी बँकांची विश्वासार्हता, वित्तीय स्थैर्य, ठेवीदारांचे हित आणि सहकार क्षेत्राची स्वायत्तता यांचा समतोल राखण्यासाठी केंद्र व राज्य यांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. कायद्याचे राज्य (Rule of Law), सहकाराची लोकशाही परंपरा आणि सुरक्षित, सक्षम बँकिंग व्यवस्था या तिन्ही मूल्यांचा समतोल राखणारी स्पष्ट व सुसंगत नियामक चौकट उभारणे, हीच आजची खरी गरज आहे.

हा लेख माझ्या वैयक्तिक अभ्यास, सहकार व बँकिंग क्षेत्रातील अनुभव आणि उपलब्ध कायदेशीर संदर्भांच्या अभ्यासावर आधारित वैयक्तिक अभिमत आहे. मी कायद्याचा पदवीधर किंवा वकिली व्यवसाय करणारा नाही. त्यामुळे हा लेख कायदेशीर सल्ला नसून विषयाच्या अभ्यास व चर्चेसाठी मांडलेले वैयक्तिक मत आहे.

**– गणेश रामचंद्र निमकर, पुणे.**
**बँकिंग सल्लागार मोबाईल – ९८२२५ ६८५५०**
**बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.**
**ई–मेल – nimkarganesh@gmail.com**

*****

व्यापारी मित्र
अमृतपर्व
25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

Payment Getway link

**भारतात कुठेही निश्चित अंक मिळण्यासाठी मॅगझीन पोस्टिंगसह वर्गणीदर**

| ३ वर्षांसाठी | २ वर्षांसाठी | १ वर्षांसाठी |
|---|---|---|
| २९०० | २००० | १०५० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# संस्कार रूपी सहकार हाच विकासाचा मूलमंत्र आहे - नानाभाऊ माळी

**नंदुरबार** – विना सहकार नाही उद्धार हे सहकार्याचे घोषवाक्य असून सहकार क्षेत्रात संस्कार असल्याशिवाय सहकार निर्माण होत नाही. प्रत्येक संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी परस्पर विश्वास आणि सहकार्याची आवश्यकता आहे. पं. दीनदयाल उपाध्याय पतपेढी सामाजिक बांधिलकी ठेवून यशस्वी वाटचाल करीत आहे, असे पतपेढीचे अध्यक्ष नानाभाऊ माळी यांनी सांगितले.



पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. सभेत प्रारंभी पंडित दीनदयाल उपाध्याय आणि भारत माता यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन केले. माळी म्हणाले, पतपेढीला गेल्या आर्थिक वर्षात २८ लाखापेक्षा अधिक नफा झाला. पतपेढीचे सभासद आणि कर्मचारी एक परिवार असून नफ्यातून सभासद कल्याण निधी २ लाख आणि कर्मचारी कल्याण निधी एक लाख पन्नास हजार रुपये काढून उर्वरित नफ्यातून सर्व सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

सभेमध्ये सभासद कल्याण वैद्यकीय मदत म्हणून मोहन भगवान माळी आणि सुनील पंढरीनाथ माळी यांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. व्यासपीठावर पतपेढीचे उपाध्यक्ष मोहन चौधरी आणि सचिव पांडुरंग माळी होते. सचिव पांडुरंग माळी यांनी विषय सूचीप्रमाणे संस्था आर्थिक लेखाजोखा मांडला. उपाध्यक्ष मोहन चौधरी यांनी ऑडिट रिपोर्टचे वाचन केले. संचालक रणवीर सिंग पाडवी यांनी अंदाजपत्रक वाचन केले. सहसचिव सुदाम खैरनार यांनी सूत्रसंचालन तर संचालक प्रसाद बेहेरे यांनी आभार मानले.

## पुणे जिल्हा बँकेच्या शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा फायदा

**पुणे** – पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या सुमारे ६१ हजार ९०० शेतकरी सदस्यांना राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा फायदा होणार आहे. ही रक्कम ५२३ कोटी इतकी असणार आहे, अशी माहिती राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितली.

जिल्हा बँकेच्या वतीने स्व. अजित पवार यांच्या जयंती निमित्त कृषी समृद्धी योजना सुरू करण्यात आली. त्या निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ते म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस यांच्याबरोबर चर्चा करून जिल्हा बँकांसाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये जिल्हा बँकांमध्ये जिल्ह्यातील ७० टक्के लोक आणि उर्वरित ३० टक्के उमेदवारांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच जिल्हा बँकेतील शिपाई, वॉचमन, ड्रायव्हर यांना परीक्षेमधून वगळण्यात आले आहे. गट सचिवांसाठी स्वतंत्र केडर तयार करण्यात आले आहे.

## ऊस उत्पादनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर होण्यास आर्थिक तरतूद

**पुणे** – ऊस उत्पादनासाठी पुणे जिल्ह्यात सुमारे ५० हजार हेक्टरवर कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करता यावा, यासाठी सुमारे एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे जिल्हा सहकारी बँक अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी सांगितली.



बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रामध्ये ऊस शेतीमध्ये हा प्रयोग केला आहे. यामुळे उसाच्या उत्पादनात ४० टक्के वाढ आणि पाण्यात ३० टक्के बचत झाली आहे. त्याचप्रमाणे रासायनिक खतांच्या वापरामध्ये २० ते ३० टक्के बचत झाली आहे. मुख्य म्हणजे जमिनीचे आरोग्य चांगले राहण्यास मदत झाली आहे. यामुळे उसाचे गुणवत्तापूर्ण उत्पादन होत असल्याने साखर कारखान्यांना उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे हंगामाचा कालावधी वाढत आहे, असे ते म्हणाले.

## इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन संस्थेच्या प्रशासकीय समितीवर डॉ. रूपा शहा

**कोल्हापूर** – इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को-ऑपरेशन संस्थेच्या प्रशासकीय समितीवर सामाजिक कार्यकर्त्या प्रा. डॉ. रूपा शहा यांची पाच वर्षांसाठी निवड झाली आहे. इंडियन सोसायटी फॉर को-ऑपरेटिव्ह स्टडीज ही संस्था राष्ट्रीय पातळीवर काम करते.

या संस्थेच्या प्रशासकीय समितीमध्ये एकूण १६ सदस्य आहेत. नाबार्ड तसेच अन्य राष्ट्रीय पातळीवरच्या संस्थांचे पदाधिकारीही या प्रशासकीय समितीचा भाग आहेत. अशा समितीवर प्राध्यापक डॉक्टर शहा यांची फेरनिवड झाली आहे. प्रा. डॉ. शहा गेली ४० वर्षे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राशी निगडित आहेत.

महावीर महाविद्यालयातून अर्थशास्त्र विभाग प्रमुख म्हणून निवृत्तीनंतर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची सहकार व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्र संयोजक या नात्यांनी निगडित आहेत. अर्थशास्त्र व सहकार विषयावर त्यांची आजवर ३८ हून अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

## लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीचा वर्धापन दिन साजरा

**पुणे** – सहकार महर्षी पुरस्कार प्राप्त करणारे राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांना लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटीच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने सन्मानित करण्यात आले. सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. किरण ठाकुर, ज्येष्ठ संचालक गजानन धामणेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजित दीक्षित, पुणे विभागीय व्यवस्थापक सुशील जाधव तसेच अन्य संचालक, अधिकारी, खातेदार उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी लोकमान्य परिवाराला शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष ठाकुर यांनी सदस्य, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक, कर्मचारी यांचे आभार मानले. सर्वांच्या सहकार्यामुळे सोसायटीची प्रगती गतिमान होण्यास हातभार लागला आहे, असे ते म्हणाले.

# सहकारी शिक्षण-प्रशिक्षण अनिवार्य असावे...

इंग्लंडमधील, रॉशडेल येथे सन १८४४ मध्ये स्थापन केलेल्या सहकारी संस्थेने आपला कारभार कसा चालवावा यासाठी एक नियमावली तयार केली, त्या नियमावलीत सभासद, संचालक व अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे असा एक महत्त्वपूर्ण नियम त्यात होता. जोपर्यंत संस्थेच्या सर्व घटकांत सहकाराची भावना व सहकारी पद्धतीने करावयाच्या व्यवहाराची/कारभाराची जाणीव निर्माण होत नाही, तोपर्यंत संस्थेचे उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही, अशी संस्थाचालकांची भावना होती व ही वस्तुस्थिती होती आणि आजही आहे. त्यामुळे रॉशडेल येथील स्थापन झालेल्या या संस्थेने तयार केलेल्या नियमांना पुढे आंतरराष्ट्रीय सहकारी संघाने सहकारी तत्त्वे म्हणून स्वीकारले.



जगदीश किल्लोळ
९४२१८ ०४४७८

परिस्थितीत झालेल्या बदलामुळे सहकारी तत्त्वांचा पुन्हा विचार करण्याची आवश्यकता भासली. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने इ.स. १९६४ मध्ये प्रा. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली समिति नियुक्त केली. या समितीने १९६६ मध्ये अहवाल सादर केला. त्यात एकूण सहा तत्त्वांचा समावेश होता. त्यातही 'सहकारी शिक्षण प्रशिक्षण' या तत्त्वाचा अग्रक्रमाने समावेश केला. या अहवालात प्रा. डी. जी. कर्वे म्हणतात, सहकारी शिक्षण ऐच्छिक किंवा दुय्यम ठरविल्यास सहकारी चळवळीच्या यश व प्रसारावर मर्यादा येईल.

✻ **सद्य:स्थिती :–** देशात एकूण ८ लाख ४५ हजार सहकारी संस्था आहेत. त्यापैकी २ लाख २३ हजार ७५९ इतक्या संस्था एकट्या महाराष्ट्रात आहेत. भारत सरकारने सहकारी संस्थांचा विस्तार वाढावा, तसेच विकास साधावा, यासाठी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभु यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने तयार केलेले 'राष्ट्रीय सहकार धोरण २०२५' तयार केले आहे.

महाराष्ट्रात सरकारनेही सहकार धोरण निश्चित करण्यासाठी समिती गठित केली आहे. त्यामुळे नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणात सहकारी संस्था स्थापित होण्याची शक्यता आहे. यामुळे सहकारी संस्थांची संख्यात्मक वाढ होत आहे. परंतु त्यासोबत गुणात्मक वाढीचे प्रयत्न न केल्यास 'सहकारातून समृद्धी' निर्माण करणारे स्वप्न साकार होणार नाही. गुणवत्तेकडे दुर्लक्ष केल्यामुळे तसेच सहकारी शिक्षण-प्रशिक्षण अनिवार्य न केल्यामुळे अनेक उणिवा किंवा दोष सहकारी संस्थांत निर्माण झाले आहेत.

**१) सभासद :–** बहुतांश सभासदाला सहकारी संस्थेचा सभासद म्हणून आपली भूमिका कशी वटवावी याची माहिती नाही. सभासदांचे अधिकार व कर्तव्यांची जाणीव नाही. संस्थेचे उद्दिष्ट कोणते आहे, त्याची अंमलबजावणी होण्यासाठी काय करावे लागेल, याची कल्पना नाही. सभेतील उपस्थिती नगण्यच असते. उपस्थित सभासदांना विषयावर चर्चा कशी करावी, प्रश्न कसे मांडावे याचा अभ्यास नाही. संस्थेची आर्थिकपत्रके कसे वाचावीत, त्यातून नेमके संस्थेच्या आर्थिक स्थितीचे आकलन कसे करावे याचा 'सहकारी प्रशिक्षणाअभावी' अभाव आहे.

**२) संचालक व पदाधिकारी :–** संस्थेचा कारभार पाहण्यासाठी सभासदांतून निवडणुकीद्वारे संचालक मंडळ निवडून दिले जाते. सहकारी कायदा, नियम, शासनाची परिपत्रके यांच्या मर्यादेत राहून निर्णय घ्यावे लागतात. सहकारी संस्था ही आर्थिक व्यवहार करणारी संस्था आहे, त्यामुळे संस्थेची आर्थिकपत्रके वाचणे, ती समजणे व त्याच्या आधारावर निर्णय करणे या बाबी दुरापास्त असतात. व्यवस्थापनविषयक व संस्थेच्या विकासाबाबतचे महत्त्वपूर्ण निर्णय संचालक मंडळात करावयाचे असतात. संचालक मंडळाला दरवर्षी किमान ३ दिवसांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य केल्यास अशा समस्या कमी होतील.

**३) पदाधिकारी :–** रोजच्या कामकाजावर लक्ष ठेवणे व सहकारी कायदा, नियम, उपविधी, शासकीय परिपत्रके यांतील तरतुदींच्या अधीन राहून साधारण सभा व संचालक मंडळाच्या सभेत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे, हे पदाधिकाऱ्यांचे काम आहे. तथापि सहकारी कायदा, नियम, उपविधी, शासकीय परिपत्रके, सहकारी तत्त्वे यांचा अभ्यास असणारे व त्यानुसार दैनिक निर्णय घेणारे, अंमलबजावणी करणारे फार थोडे पदाधिकारी प्रत्यक्षात दिसतात.

व्यवस्थापन शास्त्र, जमाखर्च, आर्थिकपत्रके व त्यांचे विश्लेषण, लेखापरीक्षण या बाबींचे ज्ञान संस्थेचे निर्णय घेण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असतात. जोपर्यंत पदाधिकाऱ्यांना संबंधित विषयांचे गुणवत्तापूर्वक प्रशिक्षण दिले जात नाही, तोपर्यंत अनुकूल बदल होणे शक्य नाही.

**४) अधिकारी :–** दैनिक कामकाज करण्याचे कार्य अधिकाऱ्यांचे असते. सहकार खाते, साधारण सभेचे निर्णय, संचालक मंडळाचे निर्णय यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने त्यांना करावयाची असते. तथापि सहकारी कायदा, नियम, व्यवस्थापन शास्त्र, सहकारी तत्त्वे व त्यानुसार व्यवहार, सहकारी संस्थांना लागू असलेले इतर कायदे, जमाखर्च, लेखापरीक्षण यांचा अभ्यासक्रम पूर्ण करून नोकरीत प्रवेश केलेले अधिकारी सहकारी संस्थेत कमी संख्येत दिसतात.

अधिकाऱ्यांचे गुणवत्तापूर्वक प्रशिक्षण करून संस्थेच्या संबंधित विषयात त्यांना पारंगत करणे व त्यांचे व्यवस्थापन कौशल्य वाढवून त्यांना कार्यतत्पर करणे गरजेचे आहे. त्यासाठी दरवर्षी ७ दिवसांचा विषयनिहाय अभ्यासक्रम त्यांना अनिवार्य केल्यास व काही प्रात्यक्षिके दाखवल्यास अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढेल. त्याचा परिणाम संस्थेचे व्यवहार वाढण्यावर व विकासावर होईल.

**५) कर्मचारी :–** संस्थेमध्ये सभासद व ग्राहकांशी सर्वांत अधिक प्रत्यक्ष संबंध संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा येतो. तो कर्मचाऱ्यांशी बोलतो, त्यांची सेवा, कार्यक्षमता, गुणवत्ता, वर्तणूक, तत्पर सेवा या सर्व गोष्टींमुळे ग्राहकांना संतोष मिळतो. त्यामुळे संस्थेचे व्यवहार वाढतात, संस्थेची प्रतिमा जनमानसात उजळते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना संस्थेच्या व्यवहारांचे ज्ञान, त्यासंबंधी कायदे, नियम, कार्यपद्धती, वर्तणूक, ड्रेसकोडचे महत्त्व, जमाखर्च, बँकिंगचे ज्ञान असलेल्या योग्य व पात्र कर्मचाऱ्यांची निवड सहकारी संस्थेने करणे गरजेचे असून त्यांना नियुक्तीपूर्वी प्रशिक्षण दिल्यास ग्राहकसेवेचा दर्जा वाढेल. या नियुक्तीपूर्वीच्या प्रशिक्षणात सहकारी चळवळ, तत्त्वे व व्यवहार, सहकारी कायदा - नियम, पोटनियम यांची ओळख, संस्थेची संगणक प्रणाली, व्यवस्थापन, ग्राहकांची मानसिकता ओळखून ग्राहकांचे समाधान करण्याचे कौशल्य, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, संस्थेच्या कामकाजाचे स्वरूप व कार्यक्षमतेने काम करण्याचे तंत्र, प्रामाणिकपणा, आपसातील सहकार्य, स्वागतमूल्य इत्यादी बाबींचा समावेश असावा.

**६) प्रशिक्षणाचे ऑडिट :–** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये प्रशिक्षणाची तरतूद आहे, तथापि प्रत्यक्षात असे दिसून येते, केवळ कायद्याची पूर्तता व्हावी म्हणून, तसेच लेखापरीक्षणात प्रशिक्षणाचे गुण प्राप्त व्हावे म्हणून थोडेफार संचालक, कर्मचारी, अधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवले जाते. प्रशिक्षणासाठी आवश्यक साधने व उपकरणे पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. प्रशिक्षणाचे प्रभावी तंत्र प्रशिक्षकांना पुरेशा प्रमाणात अवगत झाल्यास अद्ययावत माहितीच्या आधारामुळे प्रशिक्षण प्रभावी,

**पुढील पानावर...**

गुणवत्तापूर्वक, फलदायी होऊ शकेल. त्यामुळे प्रशिक्षणार्थींची गुणवत्ता, कार्यक्षमता, वागणूक सुधारण्यास आताची प्रशिक्षण व्यवस्था बऱ्याचअंशी सक्षम ठरेल. प्रशिक्षणाचा परिणाम संस्थांच्या व्यवहार वाढीवर, प्रतिमा उजळण्यावर, स्थैर्य टिकून राहण्यावर होऊ शकेल. शासनाने व सहकारी क्षेत्राने प्रशिक्षणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पावले उचलण्याची गरज आहे, योग्य व प्रभावी सहकारी शिक्षण-प्रशिक्षणासाठी खालील बाबींकडे लक्ष देणे गरजेचे वाटते.

* **सहकारी शिक्षण :-** सहकारी क्षेत्राला चांगले मानव संसाधन प्राप्त व्हावे यासाठी गुजरातमधील आनंद येथे त्रिभुवन सहकारी विद्यापीठ, स्थापन करण्याच्या विधेयकाला मंजुरी दिली. त्याप्रमाणे त्याची रीतसर स्थापना होऊन कार्य सुरू झाले आहे. या विद्यापीठाद्वारे P.hd., एम.बी.ए. (सहकार), सहकारातील पदव्युत्तर पदवी (एम.ए. सहकार), पदवी (सहकार) व पदविका पाठ्यक्रमाचे अभ्यासक्रम तयार करून ते वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, पुणे तसेच देशातील सर्व सहकारी प्रबंध संस्थाने (I.C.M.) व पदविका देशातील सर्व सहकारी प्रशिक्षण केंद्रांमधून (J.T.C.) राबविणे आवश्यक आहे.



या अभ्यासक्रमामुळे सहकाराचे सखोल ज्ञान, सहकारी कार्यपद्धतीचे सखोल ज्ञान तरुणांमध्ये रुजविता येईल. युवकांमध्ये वक्तशीरपणा, प्रामाणिकता, सहकार्याची भावना कशी निर्माण होईल याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे असेल.

**१) पीएच.डी. :** सहकारी क्षेत्रातील समस्यांचा सखोल अभ्यास व्हावा व त्या संशोधनातील महत्त्वाचे निष्कर्ष शिफारशींनुसार निर्णय प्रक्रियेत सातत्याने बदल घडत राहावा, असे या संशोधनाचे उद्दिष्ट असावे.

**२) एम.बी.ए. :** वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्थान, धनंजयराव गाडगीळ सहकारी प्रबंध संस्थान, आयसीएम इत्यादी ठिकाणी एमबीए पाठ्यक्रम सध्या चालवले जातात. या अभ्यासक्रमात सहकार क्षेत्राला आवश्यक असलेल्या विषयांचा समावेश करून सहकार क्षेत्राला उत्तम गुणवान व्यवस्थापकीय मनुष्यबळ प्राप्त होण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. मोठ्या सहकारी संस्थांनी अग्रक्रमाने कॅम्पस मुलाखती (Campus Interview) घेऊन यांना आपल्या सेवेत रुजू होण्याचे निमंत्रण द्यावे.

**३) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम :-** एम.ए. (सहकार) ही पदव्युत्तर पदवी देशातील सर्व सहकारी प्रबंध संस्थांत सुरू करावी. येथील जागा मर्यादित ठेवून गुणवत्तेवर भर ठेवावा. सहकारी क्षेत्रातील गट 'अ' व 'ब' श्रेणीतील अधिकाऱ्यांना नियुक्तीपूर्वी ही पदवी आवश्यक पात्रता म्हणून स्वीकारण्यात यावी.

**४) पदवी पाठ्यक्रम :-** पदवी पाठ्यक्रम ३ वर्षांचा असावा. त्यात सहकारी क्षेत्रातील सर्व प्रकारच्या संस्थांचे उद्देश, कार्य, कार्यपद्धती तसेच संस्था कार्यप्रवण होण्यासाठी आवश्यक ते सर्व विषय या तीन वर्षीय पदवी परीक्षेत असावेत. देशातील सर्व सहकारी प्रबंध संस्था (I.C.M.) मधून ते चालवावे. पदवीचा दर्जा कसा चांगला राहील यासाठी तत्पर राहावे. सर्व मोठ्या संस्थांतील अ, ब व क आणि प्राथमिक संस्थांतील अधिकारी वर्गासाठी ही पदवी नियुक्तीपूर्वी आवश्यक ठरवावी.

**५) पदविका :-** देशातील सर्व सहकार प्रशिक्षण केंद्रांतून पदविका पाठ्यक्रम राबवावेत. सहकारी क्षेत्राच्या गरजेनुसार पदविका पाठ्यक्रमाची रचना करावी. प्रात्यक्षिक अध्ययनाकडे लक्ष असावे. अभ्यासक्रमातील विषय व प्रात्यक्षिक अध्ययनासाठी लागणारा काळ लक्षात घेऊन ते ६ महिने किंवा ९ महिने मुदतीचे असावे. यात उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना सहकारी क्षेत्रातील गट क श्रेणीत कर्मचारी म्हणून प्राधान्याने स्वीकारण्यात यावे.

सर्व सहकारी प्रबंध संस्थान व सहकारी प्रशिक्षण केंद्रांमध्ये उच्च विभूषित व सहकारी क्षेत्राचा अभ्यास असणारे किंवा आवड असणारे प्राध्यापक, व्याख्याते नेमावेत. सर्व शैक्षणिक सोयी व साधने या संस्थांना पुरवावीत.

शैक्षणिक दर्जाचे नियमित ऑडिट व्हावे. चांगले सहकार विषयक साहित्य निर्माण करण्यासाठी प्राध्यापक व व्याख्यात्यांना प्रोत्साहित करावे.

सर्व सहकारी प्रबंध संस्थांना केंद्र शासनाने व सहकार प्रशिक्षण केंद्रांना राज्य शासनाने १००% वित्तपुरवठा करावा. लोकशाही बळकट करणे आणि जनतेचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करण्याचे उद्दिष्ट शासन व्यवस्थेचे आहे व ते सहकाराशिवाय साध्य होऊ शकत नाही, हे बहुतांश समित्यांनी आपल्या शिफारशीमध्ये प्रामुख्याने सुचविले आहे व त्यात सत्यता आहे.

* **सहकारी प्रशिक्षण :-**

**१) अभ्यासक्रम निश्चित करणे** : सभासद, संचालक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, इत्यादींच्या प्रवेशपूर्व, प्रवेशानंतर लगेच व १/२ वर्षांनी उजळणी प्रशिक्षणाचा प्रभावी अभ्यासक्रम तयार करणे गरजेचे आहे.

**२) प्रशिक्षणाची मुदत :** अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी किती काळ लागू शकतो याचा विचार करून विविध घटकांच्या व विविध प्रशिक्षण प्रकारच्या प्रशिक्षणाची मुदत ठरविण्यात यावी.

**३) प्रशिक्षणाचे साधने :** प्रशिक्षणाचे वातावरण निर्माण होईल अशा प्रशिक्षणाच्या इमारतीची निर्मिती, आधुनिक शैक्षणिक साधने यांची उपलब्धता करून देण्यात यावी.

**४) प्रशिक्षणार्थींची परीक्षा :** अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षणात प्रवेश करतेवेळी व प्रशिक्षणाचा कालावधी संपतेवेळी परीक्षा घेण्यात यावी, व मिळालेल्या गुणांच्या आधारावर त्यांची सीनियॉरिटी ठरवावी. तसेच नियुक्तीनंतर जे प्रशिक्षण घेतले जाईल त्यांचीही परीक्षा घेण्यात यावी.

**५) अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या निवडीसाठी परीक्षा :** अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवडीसाठी परीक्षा आयोजित करावी. शैक्षणिक, शारीरिक, मानसिकदृष्ट्या सक्षम आहेत काय याची चाचणी करण्यात यावी व पात्र उमेदवारांची निवड करण्यात यावी.

**६) प्रशिक्षण वर्गात सीसीटीव्ही कॅमेरे लावणे :** त्यातून प्रशिक्षणार्थींची उपस्थिती, वर्गांचे संचालन, विषयाची योग्य मांडणी व प्रशिक्षकांचा व प्रशिक्षणार्थींचा योग्य संवाद होतो काय हे तपासून पाहण्याची गरज आहे. तसेच प्रशिक्षण साहित्य, साधने, प्रशिक्षक यांचा दर्जा तपासून पाहावा.

**७) आर्थिक तरतूद** : समृद्ध समाज निर्मिती हे सरकारचे व सहकारी संस्थांचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे शासनाने अंदाजपत्रकात व सहकारी संस्थांनी आर्थिकपत्रकात पुरेशी तरतूद करावी. ही तरतूद खर्च नसून गुंतवणूक आहे; हा विचार करून योग्य तरतूद सरकारने व सहकार क्षेत्राने करण्याची गरज आहे.

सहकारी क्षेत्रातील सभासद, पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी सोयी वाढवाव्यात. वेळोवेळी प्रशिक्षणाचे ऑडिट करून प्रशिक्षणातील उणिवा नष्ट करण्यासाठी निर्देश देऊन व त्याची अंमलबजावणी योग्य झाली काय हे पाहून, तपासून प्रशिक्षण कार्य झाल्यास सहकारातून समृद्ध समाज निर्माण करता येईल. त्यासाठी सहकारी शिक्षण-प्रशिक्षण केवळ आवश्यकच नाही तर अनिवार्य करणे गरजेचे आहे व तशी तरतूद सहकारी कायद्यात करणे आवश्यक आहे.

**- प्रा. जगदीश किल्लोळ,**
**नागपूर जिल्हा पतसंस्था व कर्मचारी**
**पतसंस्था सहकारी संघ मर्या, नागपूर**

*****

# पंढरपूर अर्बन बँकेस लेखापरीक्षणात 'अ' वर्ग, सभासदांना १० टक्के लाभांश



पंढरपूर - येथील दि अर्बन बँकेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील वैधानिक लेखापरीक्षणात 'अ' वर्ग प्राप्त झाला असून, बँकेने रु. ४३.१८ कोटींचा ढोबळ नफा व रु. १७.६१ कोटींचा निव्वळ नफा मिळविला आहे. सभासदांसाठी १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे यांनी सांगितली. बदलत्या बँकिंग व्यवस्थेनुसार ग्राहकांच्या सोयीसाठी चालू आर्थिक वर्षात मोबाईल बँकिंग, यूपीआय यांसारख्या आधुनिक डिजिटल सेवा सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर केले.

बँकेची ११४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. सभेची सुरुवात स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मागील वर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कुटुंबप्रमुख आमदार प्रशांत परिचारक, विविध संस्थांचे पदाधिकारी, उपस्थित होते पंढरपूर येथील चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आठ नवोदित सीएंचा बँकेतर्फे स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

बँकेच्या आर्थिक शिस्तीसाठी मोलाचे मार्गदर्शन करणारे सीए राजेंद्र बजाज यांचा विशेष ऋणनिर्देशपर तसेच सोलापूर जिल्हा सहकार भारती अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संचालक सीए अतुल कौलवार यांचाही सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात अध्यक्ष मुळे यांनी सांगितले की, बँकेच्या प्रधान कार्यालयासह ३० शाखा कार्यरत असून, मार्च २०२६ अखेर बँकेचे ६५,५८७ सभासद आहेत. बँकेकडे रु. १,४१८.२२ कोटी ठेवी, रु. १,०३७.२९ कोटी कर्जवाटप, रु. ५३६.९१ कोटी गुंतवणूक असून एकूण रु. २,४५५.५१ कोटींचा मिश्र व्यवसाय झाला आहे. सभासद व ग्राहकांच्या विश्वासाच्या बळावर बँकेची आर्थिक वाटचाल अधिक सक्षम होत आहे. वैधानिक लेखापरीक्षणात बँकेचा सीआरएआर १४.२५ टक्के असून, मार्च २०२६ अखेर १.३६ टक्के असलेले निव्वळ थकबाकीचे प्रमाण जून अखेर ०.०० टक्क्यांवर आणण्यात यश आले आहे.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत १५ ते ३५ टक्के अनुदान असलेल्या कर्ज योजना तसेच ग्रामीण भागातील महिला वर्गासाठी प्रतिभा दुग्ध संपादन कर्ज योजना तसेच सर्व ठेवीदारांसाठी १५ महिन्यांच्या मुदतीची ८ टक्के व्याजदराची 'सुधन ठेव योजना' कार्यान्वित करण्यात आली. योजनांमधील लाभार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

बँकेचे कुटुंबप्रमुख परिचारक यांनी मार्गदर्शन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. सभासदांनीही बँकेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. बँकेच्या उपाध्यक्ष माधुरी जोशी संचालक राजाराम परिचारक रजनीश कवठेकर, हरिष ताठे, पांडुरंग घंटी, शांताराम कुलकर्णी, विनायक हरिदास, अमित मांगले, अनंत कटप, गणेश शिंगण, ऋषिकेश उत्पात, व्यंकटेश कौलवार, संगिता पाटील, मनोज सुरवसे, अनिल अभंगराव, गजेंद्र माने, प्रभुलिंग भिंगे, उदय उत्पात, सोमनाथ होरणे, शुभम लाड, बँकेचे सभासद, ग्राहक हितचिंतक उपस्थित होते.

## कर्ज वितरण, कर्जाचे विविध प्रकार आणि नियम यावरील प्रशिक्षण वर्ग यशस्वी

**सांगली** - कर्ज वितरण करताना घ्यावयाची काळजी, कर्जांचे विविध प्रकार आणि पतसंस्थांना लागू असलेल्या आयकर कायद्यातील नियमांची सविस्तर माहिती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेचे संचालक सीए शिरीष गोडबोले यांनी सांगितली.

येथील क्रांतीज्योती महिला सहकारी पतसंस्थेच्या संचालिका, सारीका मुळे यांनी पुढाकार घेऊन सर्व पतसंस्थांमधील संचालकांची नियोजन समिती स्थापन केली व पतसंस्थांच्या संचालकांसाठी - कर्मचाऱ्यांसाठी, सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. प्रशिक्षण वर्गात सर्व ७ सहकारी पतसंस्थांचे ६३ संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेशाचे पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख व कर्मवीर मल्टीस्टेट सहकारी पतसंस्था, संस्थापक अध्यक्ष सागर चौगुले यांनी, कर्ज वसुलीची प्रक्रिया संचालकांची जबाबदारी व कर्तव्ये तसेच संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी संचालकांचा व कर्मचाऱ्यांचा सहभाग कसा असला पाहिजे याची प्रभावी मांडणी केली. प्रशिक्षण सहकारी संस्थेचे संचालक उदय पेंडसे यांनी सहकार भारती संस्थेची तसेच प्रशिक्षण संस्थेची सविस्तर माहिती सांगितली.

प्रशिक्षण वर्गाचा प्रारंभ पतसंस्थांच्या अध्यक्षांच्या हस्ते दिपप्रज्वलन व सरस्वती पुजनाने झाला. सूत्रसंचालन प्रकाश टकले यांनी केले. वर्ग यशस्वी होण्यासाठी नियोजन समितीचे उत्तम सहकार्य मिळाले. सहकारातील ज्येष्ठ कार्यकर्ते निळकंठ माळकर यांचे व पंडित नेहरू विद्यालयाचे विशेष सहकार्य लाभले. सहभागी पतसंस्थांना गोडबोले व पेंडसे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

मिरज तालुक्यातील कवलापूर एक छोटेसे गाव.गावात ७ सहकारी पतसंस्था आहेत. त्या सर्व उत्तम स्थितीत चालू आहेत. ग्रामीण भागातील ग्राहकांची गरज ओळखून, माणसे ओळखून केलेल्या कर्जपुरवठ्यामुळे थकबाकीचे प्रमाणही अत्यल्प आहे. सर्वात जुनी संस्था ४३ वर्षांपूर्वीची तर नुकतीच तीन वर्षांपूर्वी स्थापन झालेली महिला सहकारी पतसंस्थाही चांगले काम करत आहे.

## राज्य पतसंस्था फेडरेशनच्या कार्याध्यक्षपदी राजूदास जाधव

**पुणे** - महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन या शिखर संस्थेच्या कार्याध्यक्षपदी राजूदास जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पुणे येथील फेडरेशनच्या कार्यालयात संचालक मंडळाची विशेष सभा जिल्हा उपनिबंधक मिलिंद टांकसाळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन, महासचिव शशिकांत राजोबा व संचालकांच्या एकमताने जाधव यांची निवड झाली. काका कोयटे, दादाराव तुपकर, शांतीलाल शिंगी, धनंजय तांबेकर, अंजली पाटील, सुरेश पाटील, शरद जाधव, चंद्रकांत वंजारी, सुभाष आकरे, नारायणराव वाजे, जवाहर छाबडा, भारती मुथा, रवींद्र भोसले, सुरेखा लवांडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी रवींद्र भोसले यांची समन्वयक म्हणून घोषणा करण्यात आली.

## कॉसमॉसच्या फायनान्स बिझनेस विभागाचा दुसरा वर्धापन दिन साजरा

**पुणे** - येथील कॉसमॉस सहकारी बँकेच्या स्मोल फायनान्स बिझिनेस विभागाचा दुसरा वर्धापन दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वसामान्य नागरिक यांना आवश्यक तो कर्ज पुरवठा करून मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हा विभाग सुरू करण्यात आला आहे. या विभागाने दोन वर्षांच्या कालावधीत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत या विभागाने ४८ कोटींपेक्षा अधिक रूपयांचा व्यवसाय केला आहे. तसेच सुमारे १५०० पेक्षा अधिक ग्राहकांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले आहे.




# शालिवाहन सहकारी पतसंस्थेचा सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर

**पैठण –** केंद्र सरकारने नवीन सहकार धोरण २०२५ जाहीर केल्याने सहकार क्षेत्रातील मरगळ दूर होऊन भविष्यात सहकार क्षेत्राला सुगीचे दिवस येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व सहकार मंत्री अमित शहा यांचे संकल्पनेतून साकारलेले हे ऐतिहासिक पाऊल मानले जाते, असे शालिवाहन पतसंस्थेचे अध्यक्ष किशोर चौहान यांनी सांगितले.

पैठण येथील शालिवाहन सहकारी पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथे अध्यक्ष किशोर चौहान यांचे अध्यक्षतेखाली व सभासदांच्या उपस्थितीत झाली. अध्यक्ष किशोर चौहान, उपाध्यक्ष डॉ. जयंत जोशी, सचिव प्रकाश कासलीवाल, दीपक आहुजा, गणेश लोहिया, डॉ. पंडित किल्लारीकर, बाबासाहेब राऊत, सुनील शेळके, ॲड. राजेंद्र गोर्डे, रुपेश चौहान, सुमन म्हस्के, ज्योती मैड हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. मानद सचिव प्रकाश कासलीवाल यांनी मागील वर्षाचे इतिवृत्त वाचन केले.

वार्षिक सभेच्या सुरुवातीला सभासदांसाठी आयोजित सहकार प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्हा विकास अधिकारी सुवर्णा सूर्यवंशी व आर. बी. देशमुख यांनी मार्गदर्शन केले. सहायक निबंधक बलराम नवथर सहकार अधिकारी तुषार खिस्ती उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण गायके यांनी सूत्रसंचालन केले.

अध्यक्ष चौहान यांनी सांगितले की, संचालक मंडळाची भक्कम साथ, समर्पण भावनेने सेवा देणारे सर्व अधिकारी, कर्मचारी व सेवक वर्ग तसेच सभासद यामुळेच महाराष्ट्रभर गरुड झेप घेत २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त झाला आहे. संस्थेने ३२२ कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला असून संस्थेला २ कोटी ११ लाख ५७ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला. सभासदांना १२ टक्के लाभांश जाहीर केला.

सन २०२५-२६ चा वार्षिक ताळेबंद, नफा तोटा पत्रक, अंदाजपत्रक याची माहिती सादर केली. २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक लेखा परीक्षकाची नियुक्ती त्यांचे मानधन निश्चित करणे, २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालास मान्यता देणे, व्यवस्थाकीय संचालकपद निर्माण करणे इत्यादी विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले.पतसंस्थेचे नूतन संचालक रुपेश चौहान यांचा सत्कार नरसिंह शिसोदे यांनी तर ज्योती मैड यांचा सत्कार रईसा सय्यद यांनी केला.

उपाध्यक्ष डॉ. जयंत जोशी यांनी मनोगत व्यक्त केले. नूतन युवा संचालक रुपेश चौहान यांनी आजचा युवा शिक्षित आहे, तंत्रज्ञानात पारंगत आहे, नवनवीन कल्पना आहेत, समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द आहे. तरुणाईची शक्ती सहकार सोबत जुडल्यास खूप मोठी क्रांती होईल म्हणून युवा शक्तीने सहकारासोबत जोडावे असे आवाहन केले.

जनसंपर्क अधिकारी नरेश सिकची, मुख्य अधिकारी अरुणा पिल्लई, शाखा व्यवस्थापक तृप्ती गुरव, प्रीतम घोडके, अश्विनी सोरमारे यांनी सहकार गीत सादर केले. २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्वोकृष्ट व्यवसाय केल्याबद्दल पाचोड शाखा प्रथम, चितेगाव शाखा द्वितीय, गारखेडा शाखा तृतीय सर्वोत्कृष्ट नवोदित शाखा म्हणून शाखा पाथर्डी प्रथम, अंबड शाखा द्वितीय तसेच शाखा पैठणला ठेव वृद्धी गौरव पुरस्कार, शाखा वैजापूरला ग्राहक सेवा भूषण पुरस्कार शाखा कन्नडला सुवर्ण कर्ज वृद्धीप्रथम तर शाखा सिल्लोड ला द्वितीय पुरस्कार व आदर्श अधिकारी म्हणून येवला शाखा व्यवस्थापक अरविंद जोशी आदींना सन्मानित करण्यात आले. मुख्य अधिकारी शिवाजी घोडसे यांनी स्वागत केले.

## रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राज्यात दुसऱ्या स्थानावर

**रत्नागिरी –** रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक राज्यात दुसऱ्या स्थानापर्यंत पोचली आहे, असे रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. तानाजीराव चोरगे यांनी सांगितले. रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. चोरगे बोलत होते.

बँक ही एक वित्तीय संस्था आहे. त्यामुळे त्याला शिस्त आवश्यक असते. आज बँकेची स्थिती खूप चांगली आहे. राज्यात दुसऱ्या स्थानावर आहे, असे त्यांनी सांगितले. बँकेचे उपाध्यक्ष बाबाजीराव जाधव, तज्ज्ञ संचालक रमेश कीर, दीपक पटवर्धन, मंदार सप्रे, आबा टिळेकर, अमजद बोरकर, नेहा माने आदींसह सर्व संचालक व सभासद, बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या दोन योजनांची सुरुवात

**पुणे –** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आरबीआयने बॉण्ड उभारण्यास परवानगी दिली आहे. म्हणजे बँकेच्या भक्कम आर्थिक स्थितीची आणि सातत्यपूर्ण प्रगती व सक्षम व्यवस्थापनाची पावती आहे, असे मत राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने एलटीएसबी आणि पीडीआय या दोन योजनांचा प्रारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. बँक अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, मुख्य कार्यकारी अधिकारी संहाय शितोळे, तसेच संचालक, अधिकारी उपस्थित होते. यावेळी पहिल्या गुंतवणूकदार यांना बॉण्ड प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. अनास्कर यांनी या योजनेमध्ये दोन लाख रुपयांची गुंतवणूक करण्याचे जाहीर केले. उपमहाव्यवस्थापक डॉ. कदम यांनी आभार मानले.

# सहकारी बँकांना स्वतंत्र विपणन विभागाची गरज
# बदलत्या बँकिंग युगातील विकासाचा नवा मंत्र

भारतातील बँकिंग क्षेत्र गेल्या दोन दशकांत प्रचंड वेगाने बदलले आहे. एकेकाळी बँकेची शाखा, तिची विश्वासार्हता आणि कमी व्याजदर या गोष्टी ग्राहकांसाठी महत्त्वाच्या होत्या. आजचे चित्र पूर्णपणे बदलले आहे. ग्राहकाला जलद सेवा, सुलभ कार्यपद्धती, मोबाईलवर उपलब्ध सुविधा, कमी वेळेत निर्णय आणि त्याच्या गरजेनुसार आर्थिक सेवा अपेक्षित आहेत. ग्राहक बँकेचा शोध घेत नाही तर बँका ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची स्पर्धा करीत आहेत.



जयंत केसकर
70203 09134

या बदलत्या परिस्थितीत सहकारी बँकांनी स्वतःचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपल्या बँकेची आर्थिक स्थिती, विश्वासार्हता आणि स्थानिक समाजातील प्रतिमा चांगली असूनही व्यवसाय वाढ अपेक्षेप्रमाणे का होत नाही? अनेक ठिकाणी ठेवी वाढतात; मात्र कर्जवाटप अपेक्षित गतीने वाढत नाही. नवीन ग्राहक मिळविण्याचा वेग मंदावलेला दिसतो. यामागे अनेक कारणे असली, तरी सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे व्यावसायिक विपणनाचा अभाव. आजही अनेक सहकारी बँका ग्राहक स्वतः बँकेत येईल या पारंपरिक विचारावर काम करतात. आजचा काळ ग्राहकांची वाट पाहण्याचा नाही, तर ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा आहे.

**✻ बदललेला ग्राहक – बदललेली स्पर्धा –** पूर्वी ग्राहक परिसरातील बँकेत खाते उघडत असे आता तो मोबाईलवर माहिती मिळवतो, विविध संस्थांची तुलना करतो आणि जिथे प्रक्रिया सोपी सेवा जलद आणि प्रतिसाद तत्पर असेल, त्या संस्थेची निवड करतो. याचाच परिणाम असा झाला आहे की, खासगी बँका, बिगर बँकिंग वित्तीय संस्था (NBFC) आणि वित्तीय तंत्रज्ञानावर आधारित कंपन्या (FinTech) यांनी ग्राहक मिळविण्यात मोठी आघाडी घेतली आहे. विशेष म्हणजे, या संस्था सहकारी बँकांपेक्षा अनेक वेळा जास्त व्याजदराने कर्ज देतात; तरी त्यांची कर्जवाढ अधिक वेगाने होते. याचा अर्थ ग्राहक केवळ कमी व्याजदर पाहत नाही. तो वेळ, सुविधा, सुलभता आणि विश्वास यांचे एकत्रित मूल्य पाहतो.

**✻ आकडेवारी काय सांगते? –** उपलब्ध आकडेवारीनुसार देशातील अग्रगण्य बिगर बँकिंग वित्तीय संस्था बजाज फायनान्सची मालमत्ता सुमारे चार लाख कोटी रुपये आहे. विशेष म्हणजे, भारतातील सर्व शहरी सहकारी बँकांची एकत्रित मालमत्ता यापेक्षा कमी आहे. ही तुलना केवळ आकड्यांची नाही; ती विचार करण्याची दिशा दाखवते. एका संस्थेने ग्राहक केंद्री धोरण, आधुनिक तंत्रज्ञान, नियोजनबद्ध प्रसिद्धी, माहितीचे विश्लेषण आणि जलद निर्णय यांवर भर देऊन देशातील सर्वात मोठ्या वित्तीय संस्थांमध्ये स्थान मिळवले दुसरीकडे, अनेक सहकारी बँका अजूनही पारंपरिक पद्धतीने व्यवसाय वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत.



**✻ कमी व्याजदर असूनही व्यवसाय का वाढत नाही? –** सहकारी बँकांकडे अनेक जमेच्या बाजू आहेत त्या कमी व्याजदरात कर्ज देऊ शकतात. स्थानिक समाजात त्यांच्यावर विश्वास असतो ग्राहकांशी त्यांचे वैयक्तिक संबंध असतात. तरीही अपेक्षित वेगाने व्यवसाय वाढत नाही. यामागील कारणे स्पष्ट आहेत. १) ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचा नियोजनबद्ध प्रयत्न होत नाही. २) नवीन ग्राहक शोधण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नसते. ३) आधुनिक माध्यमांचा वापर मर्यादित असतो. ४) कर्ज मंजुरीची कार्यपद्धती अनेकदा गुंतागुंतीची आणि वेळखाऊ असते. ५) बँकेच्या सेवा आणि योजनांची प्रभावी माहिती लोकांपर्यंत पोहोचत नाही. यामुळे अनेक संभाव्य ग्राहक इतर संस्थांकडे वळतात.

**✻ भारतीय रिझर्व्ह बँकेचे संकेत –** भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या काही वर्षांत सहकारी बँकांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता, भांडवली पर्याप्तता, जोखीम व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षेला विशेष महत्त्व दिले आहे. त्यामुळे अनेक सहकारी बँकांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. मात्र, आर्थिक स्थैर्य ही वाढीची पहिली अट आहे; शेवटची नाही. व्यवसाय वाढविण्यासाठी नियोजन, ग्राहकाभिमुखता आणि प्रभावी विपणन यांना पर्याय नाही. राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (NABARD) ग्रामीण भागात स्वयं-सहायता गट, संयुक्त दायित्व गट, वित्तीय साक्षरता आणि गावोगावी पोहोचणाऱ्या उपक्रमांद्वारे लाखो लोकांना औपचारिक बँकिंग व्यवस्थेशी जोडले. लोक आमच्याकडे येतील याची वाट पाहू नका; आम्ही लोकांपर्यंत जाऊ. याच तत्त्वाचा स्वीकार आज शहरी सहकारी बँकांनी करण्याची वेळ आली आहे.

**✻ स्वतंत्र विपणन विभाग-काळाची गरज –** अनेक सहकारी बँकांमध्ये लेखा विभाग, कर्ज विभाग, वसुली विभाग, लेखापरीक्षण विभाग, कायदा विभाग असतो; पण स्वतंत्र विपणन विभाग नसतो. आजच्या स्पर्धेच्या युगात ही मोठी उणीव आहे. विपणन विभागाचे काम केवळ जाहिराती देणे नसते. त्याची भूमिका अधिक व्यापक असते.

१) बाजारपेठेचा अभ्यास करणे. २) स्पर्धकांच्या कामकाजाचा अभ्यास करणे. ३) संभाव्य ग्राहकांचा शोध घेणे. ४) विविध व्यावसायिक संघटनांशी संपर्क ठेवणे. ५) ग्राहकांच्या बदलत्या गरजांचा अभ्यास करणे. ६) नवीन योजना तयार करण्यासाठी व्यवस्थापनाला सूचना देणे. ७) शाखांना व्यवसायवाढीसाठी मार्गदर्शन करणे. ८) डिजिटल माध्यमातून बँकेची सकारात्मक प्रतिमा निर्माण करणे. प्रत्येक सहकारी बँकेने भविष्यात स्वतंत्र प्रमुख विपणन अधिकारी नेमण्याचा गंभीरपणे विचार करायला हवा.

वर्षाच्या सुरुवातीलाच व्यवसायाचा आराखडा ठरवा, अनेक बँकांमध्ये व्यवसाय वाढीचा विचार वर्षभर चालू असतो; पण नियोजन मात्र स्पष्ट नसते. प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच संचालक मंडळ आणि वरिष्ठ व्यवस्थापनाने ठरवले पाहिजे – १) यावर्षी कोणत्या प्रकारची कर्जे वाढवायची? २) कोणत्या ग्राहकवर्गावर विशेष भर द्यायचा? ३) कोणत्या भागात व्यवसाय वाढवायचा? ४) कोणत्या शाखेला कोणते उद्दिष्ट द्यायचे?

उदाहरणार्थ- - गृहकर्ज - सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग- महिला उद्योजक- डॉक्टर

सनदी लेखापाल- व्यापारी- सेवा व्यवसाय- शिक्षण कर्ज - वाहन कर्ज

जेव्हा बँक स्वतः आपला ग्राहकवर्ग ठरवते, तेव्हा व्यवसाय वाढविणे अधिक सुलभ होते.

जो येईल त्यालाच सेवा ही मानसिकता बदलली पाहिजे भविष्यातील यशस्वी बँका त्या असतील ज्या ग्राहकाची वाट पाहणार नाहीत. त्या ग्राहकाच्या व्यवसायापर्यंत, उद्योगापर्यंत, व्यापारी संघटनांपर्यंत, गृहनिर्माण संस्थांपर्यंत आणि नवउद्योजकांपर्यंत स्वतःहून पोहोचतील. यालाच आधुनिक बँकिंग म्हणतात.

**✻ सहकारी बँकांचे बलस्थाने –** सहकारी बँकांकडे अनेक अशी बलस्थाने आहेत, जी इतर कोणत्याही संस्थांकडे सहज उपलब्ध नाहीत. स्थानिक समाजातील विश्वास, ग्राहकांशी वैयक्तिक नाते, संचालकांचा स्थानिक संपर्क,

**पुढील पानावर...**

## शिंदखेडा सह. ग्रामोद्योग संघ निवडणूक बिनविरोध

**शिंदखेडा** – तालुका सहकारी ग्रामोद्योग संघाची पंचवार्षिक निवडणूक पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली बिनविरोध झाली. अध्यक्षपदी विजय सुरेश मोरे तर उपाध्यक्षपदी मालपूर येथील मगन ठाकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

ग्रामोद्योग संघाच्या नूतन संचालक मंडळांमध्ये राजेंद्र आडगाळे, प्रकाश भगवान पाटील, लोटन आसाराम पाटील, विलास नामदेव माळी, मालपूर येथील देविदास धर्मा बागुल, विनोद रमेश बोरसे, मन्यार आजिमखाँ राजवखाँ, गोरख न्हानू ठाकरे, कलाबाई सुरेश मोरे आणि सुनंदाबाई रमेश बोरसे आदींचा समावेश आहे. सहकार निबंधक डी. ए. सिरगावे सहाय्यक जयंत शिंपी मनोहर माळी, प्रमोद शिंपी उपस्थित होते.

## पुणे कंटोन्मेंट बँकेची महिलांसाठी कर्जयोजना

**पुणे** – पुणे कंटोन्मेंट सहकारी बँकेच्या आजवरच्या प्रगतीशील वाटचालीत सदस्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष कैलास कोंद्रे यांनी सांगितले. बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली त्यावेळी ते बोलत होते. मार्चअखेर बँकेला २.१५ कोटी नफा तर ठेवी ३७३.९७ कोटींच्या असून २४६.३८ कोटींचे कर्ज वितरण करण्यात आले आहे तर एनपीए ४.३८ टक्के आहे आणि लेखा परीक्षण अहवालात ‘अ’ दर्जा मिळाला आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली. बँकेच्या वतीने महिलांसाठी कर्ज योजना सुरू करण्यात आली असून त्याचा व्याज दर हा सर्वात कमी ठेवण्यात आला आहे. या योजनेला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बँक सदस्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सभेला बँकेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, खातेदार उपस्थित होते

## गोवा सहकारी संस्था अध्यादेशातील दुरुस्तीची सहकार भारतीची मागणी

**पणजी** – गोवा सहकारी संस्था अध्यादेशात काही तरतुदींमध्ये दुरुस्ती करून तो अधिक व्यावहारिक आणि घटनात्मकदृष्ट्या सुसंगत करण्यात यावा अशी मागणी गोवा प्रदेश सहकार भारतीच्या वतीने नुकतीच करण्यात आली आहे. याबाबतचे एक सविस्तर निवेदन सहकार भारतीच्या एका शिष्टमंडळाच्या वतीने सहकार निबंधक आशुतोष आपटे यांना देण्यात आले आहे. शिष्टमंडळात लालजी पागी, रघुवीर वस्त, उल्हास मांद्रेकर, श्रीपाद परब, अनिल गावकर, सुकान्त अवखळे, वासुदेव परब, नरेषा पेडणेकर, विठोबा बगळी, संजय केसरकर, भालचंद्र नार्वेकर, शिवराज परब, कृष्णा गावकर यांचा समावेश होता. निवेदनात म्हटले आहे की अध्यादेशातील दुरुस्तीमुळे सर्वसाधारण सभेचे अधिकार, संचालक मंडळाची लोकशाही रचना, संचालकांची पात्रता आणि अपात्रता, अधिकारी आणि कर्मचारी भरती, लेखापरीक्षण प्रक्रिया वैधानिक अहवाल सादर करण्याची पद्धती याचा सहकारी संस्थांच्या कामकाजावर परिणाम होणे शक्य आहे.

अध्यादेश अंमलात आणण्यापूर्वी त्यातील कलमांमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे म्हणून याचा गांभीर्याने विचार करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. यावेळी सहकार भारतीचे पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

## नाफेडचे माजी अध्यक्ष चांगदेवराव होळकर यांचे निधन

**लासलगाव** – नाफेडचे माजी अध्यक्ष आणि सहकार क्षेत्रातील ज्येष्ठ नेते चांगदेवराव होळकर यांचे नुकतेच निधन झाले. ते ९५ वर्षाचे होते. त्यांच्या मागे पत्नी, चार मुले, सुना, नातू असा परिवार आहे. होळकर हे गेली ७ दशकांहून अधिक काळ शेतकरी, सहकार आणि शिक्षण क्षेत्रात कार्यरत होते. त्यांनी वेफको संस्थेची स्थापना करून नेतृत्त्व केले.

## श्री साईबाबा नागरी सहकारी बँकेच्या वतीने सदस्यांना १० टक्के लाभांश

**नाशिक** – सेलू येथील श्री साईबाबा नागरी सहकारी बँकेच्या वतीने सदस्यांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. बँकेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये बँक अध्यक्ष हेमंत आडळकर यांनी वरील घोषणा केली. उपाध्यक्ष चंद्रशेखर मुळावेकर, माजी नगराध्यक्ष पवन आडळकर, तसेच संचालक, अधिकारी, खातेदार उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी रामराव लाडाने यांनी प्रास्ताविक केले. आणि बँकेच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेतला. नूतन नगराध्यक्ष मिलिंद सावंत यांचा सन्मान करण्यात आला.

बँकेला १ कोटी ५९ लाख इतका नफा झाला असून वसूल भाग भांडवल ७ कोटी २१ लाख स्वनिधी २५ कोटी ठेवी २६७ कोटी २२ लाख, कर्जवाटप १५४ कोटी आणि एनपीए १.०५ टक्के आहे. १० हजार ३६५ सदस्य संख्या आहे. बँकेला आजवर १२ वेळा विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**मागील पानावरून...**

## सहकारी बँकांना स्वतंत्र विपणन विभागाची गरज ...

निर्णय प्रक्रियेतील लवचिकता, समाजाभिमुख कार्यपद्धती आणि कमी व्याजदर ही त्यांची मोठी ताकद आहे. ही ताकद योग्य नियोजनाने वापरली, तर सहकारी बँका कोणत्याही मोठ्या संस्थेशी स्पर्धा करू शकतात. कमकुवत बाजू ओळखण्याची गरज याचबरोबर काही मर्यादाही स्वीकाराव्या लागतील. अनेक बँकांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर अपुरा आहे. नवीन ग्राहक मिळविण्यासाठी कोणतेही निश्चित धोरण नाही. कर्मचाऱ्यांना विक्री आणि ग्राहक संवादाचे प्रशिक्षण कमी दिले जाते. डिजिटल माध्यमातील उपस्थिती अत्यल्प आहे. अनेकदा शाखेची कार्यपद्धतीही ग्राहकाभिमुख नसते. या उणिवा दूर केल्याशिवाय विकासाचा वेग वाढणार नाही.

आज देशात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग झपाट्याने वाढत आहेत. महिला उद्योजक, नवउद्योग, व्यावसायिक सेवा, गृहनिर्माण क्षेत्र, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वित्तपुरवठ्याची गरज निर्माण होत आहे. या प्रत्येक क्षेत्रासाठी स्वतंत्र योजना तयार करून सहकारी बँका मोठ्या प्रमाणावर व्यवसाय वाढवू शकतात. खासगी बँका, बिगर बँकिंग वित्तीय संस्था आणि वित्तीय तंत्रज्ञान कंपन्या दिवसेंदिवस अधिक सक्षम होत आहेत. त्यांची कार्यपद्धती वेगवान आहे. ग्राहकांना कमी वेळेत सेवा मिळते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. जर सहकारी बँकांनी वेळेवर बदल स्वीकारले नाहीत, तर भविष्यातील स्पर्धा अधिक कठीण होईल.

✻ **डिजिटल माध्यमांचा स्वीकार** – आज सामाजिक माध्यमे ही केवळ मनोरंजनाची साधने राहिलेली नाहीत. ती ग्राहकांपर्यंत पोहोचण्याचे प्रभावी माध्यम बनली आहेत. बँकेने योजना, ठेवी, कर्ज योजना, यशोगाथा आणि वित्तीय साक्षरतेचे संदेश नियमितपणे डिजिटल माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवले पाहिजेत. यामुळे बँकेची विश्वासार्ह प्रतिमा तयार होते आणि नवीन ग्राहक जोडले जातात.

✻ **शाखा व्यवस्थापक – व्यवसाय वाढीचा दुवा** – प्रत्येक शाखा व्यवस्थापक हा केवळ प्रशासकीय अधिकारी नसून व्यवसाय वाढीचा प्रमुख प्रतिनिधी असला पाहिजे. नियमितपणे व्यापारी संघटना, औद्योगिक वसाहती, गृहनिर्माण संस्था, डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल, उद्योजक आणि व्यावसायिक यांच्याशी संपर्क ठेवला पाहिजे. शाखेच्या चार भिंतींबाहेर पडल्याशिवाय व्यवसाय वाढत नाही, हे वास्तव स्वीकारावे लागेल. ग्राहकांचा समाधानकारक अनुभव हीच सर्वोत्तम प्रसिद्धी. जाहिरातीपेक्षा समाधानी ग्राहक अधिक प्रभावी असतो. वेगवान सेवा, नम्र वागणूक, स्पष्ट माहिती, पारदर्शक शुल्क आणि वेळेत घेतलेले निर्णय यामुळे ग्राहक स्वतः नवीन ग्राहक घेऊन येतो.

**– जयंत केसकर, पुणे मो.नं. – ७०२०३ ०९१३४** ✻✻✻

# नागरी सहकारी बँकांचे प्रगतीपुस्तक

रिझर्व बँक ऑफ इंडिया दरवर्षी जून महिन्यामध्ये फायनान्शिअल स्टॅबिलिटी रिपोर्ट प्रसिद्ध करीत असते. अन्य आर्थिक बाबींसोबत बँकिंगमधील महत्त्वाची आकडेवारी, तुलनात्मक चार्ट, मागील वर्षांशी तुलना आणि स्टँडर्डशी तुलना असे या रिपोर्टचे सर्वसाधारण स्वरूप असते.

या रिपोर्टमध्ये शेड्युल्ड व्यापारी बँका, नागरी सहकारी बँका, बँकेतर वित्त कंपन्या (NBFC) या सर्वांच्या कामगिरीवर भाष्य केलेले असते. रिझर्व बँकेला अपेक्षित काय आहे आणि प्रत्यक्षात काय झाले आहे. याबाबतची आकडेवारी चार्ट्स आणि ग्राफ्स या रिपोर्टमध्ये समाविष्ट असतात. बँकिंग व्यवसायापुरता विचार केल्यास बँकिंग व्यवसायाचे हे प्रगतिपुस्तक आहे, असे समजण्यास हरकत नाही. या रिपोर्टमधील नागरी सहकारी बँकाच्या संदर्भातील आकडेवारी, भाष्य याचा धावता आढावा पुढीलप्रमाणे आहे.



डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

**※ नागरी सहकारी बँकांची कामगिरी –**

**१) कर्ज व्यवहार –** मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षी नागरी सहकारी बँकांच्या कर्ज व्यवहारात ९.६ टक्के इतकी वाढ नोंदविण्यात आली आहे. यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांची वाढ ९.७ टक्के इतकी असून नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांची वाढ ९.५ टक्के इतकी आहे.

**२) ग्रॉस आणि नेट एनपीए –** सर्व नागरी सहकारी बँकांचा ग्रॉस एनपीए ५.२ टक्के इतका असून नेट एनपीए एक टक्का आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही आकडेवारी प्रगतिपथावर आहे. मागील वर्षापेक्षा ग्रॉस आणि नेट एनपीए कमी झालेला आहे. यामध्ये शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा ग्रॉस एनपीए ४ टक्के असून नेट एनपीए ०.८ इतका आहे. नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा ग्रॉस एनपीए ६.३ टक्के असून नेट एनपीए १.१ टक्के इतका आहे.

**३) नेट इंटरेस्ट मार्जिन –** नागरी सहकारी बँकांचे नेट इंटरेस्ट मार्जिन ३.३ टक्के असून मागील वर्षाच्या तुलनेत या आकड्यात किंचित वाढ झाली आहे. यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा नेट इंटरेस्ट मार्जिन तीन टक्के असून नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा नेट इंटरेस्ट मार्जिन साडेतीन टक्के आहे. लाभक्षमतेसाठी तीन टक्क्यांच्या पुढे नेट इंटरेस्ट मार्जिन असावा, असा बँकिंगचा सर्वसाधारण नियम आहे.

**४) रिटर्न ऑन इन्वेस्टमेंट –** सर्व नागरी सहकारी बँकांचा रिटर्न ऑन इन्वेस्टमेंट ६.३ टक्के इतका आहे. या टक्केवारीत मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट ६.७ टक्के असून नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांसाठी ही टक्केवारी सहा टक्के इतकी आहे. दोन्ही गटांत मागील वर्षापेक्षा या टक्केवारीत घट आहे.

**५) पर्याप्त भांडवल –** सर्व नागरी सहकारी बँकांच्या पर्याप्त भांडवलाचा आकडा १७.७ टक्के इतका आहे. हा आकडा मागील वर्षीच्या आकड्याशी मिळताजुळता आहे. यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा पर्याप्त भांडवलाचा आकडा १६.६ टक्के असून नॉन शेड्युल नागरी सहकारी बँकांचा आकडा १८.७ टक्के इतका आहे. नागरी सहकारी बँकांसाठी पर्याप्त भांडवलाची अट नऊ टक्के आहे तर अनेक सोयी मिळवण्यासाठी अकरा टक्केची आहे. या पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकांचा भांडवली पाया मजबूत असल्याचे दिसून येते.

**६) प्रोव्हिजनिंग कव्हरेज रेशो –** नागरी सहकारी बँकांचा प्रोव्हिजनिंग कव्हरेज रेशो ९७.८ टक्के इतका भरभक्कम आहे. यापैकी शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा हा रेशो ९० टक्के आहे तर नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँकांचा हा रेशो १०२.४ टक्के इतका आहे. थकीत कर्जाच्या तरतुदी संदर्भातलक्षा हा रेशो समाधानकारक आहे.

**※ प्रगतीची काही चिन्हे –** नागरी सहकारी बँकांच्या कामगिरीची तुलना नेहमी व्यापारी बँकांसोबत करण्यात येते. या वर्षीच्या रिपोर्टमध्ये पर्याप्त भांडवलाच्या बाबतीत नागरी सहकारी बँका व्यापारी बँकांच्या बरोबर आहेत. दोन्हींचा आकडा १७.७ टक्के इतका आहे.

त्याचप्रमाणे नेट इंटरेस्ट मार्जिनचा आकडाही दोन्ही बँकांच्या बाबतीत सारखा म्हणजेच ३.३ टक्के इतका आहे. प्रोव्हिजन कव्हरेज रेशो मध्ये नागरी सहकारी बँका, व्यापारी बँकांपेक्षा पुढे आहेत. व्यापारी बँकांसाठी हा रेशो ७५.६ टक्के इतका आहे तर नागरी सहकारी बँकांचा हा रेशो ९७.८ टक्के इतका आहे.

**※ ग्रॉस आणि नेट एनपीएची काळजी –** आपल्या थकीत कर्जांच्या बाबतीत नागरी सहकारी बँकांना यापुढे अधिक काळजी घेणे आवश्यक राहील. व्यापारी बँकांच्या थकीत कर्जाचा आकडा, ग्रॉस आणि नेट अनुक्रमे एक टक्का आणि ०.४ टक्के असा आहे, तर नागरी सहकारी बँकांसाठी हेच आकडे ५.२ टक्के आणि १.८ टक्के असे आहेत. ही बाब खरोखरच काळजीची आहे व्यापारी बँका आपली कर्ज ज्या सहजपणे निर्लेखित करू शकतात, त्या प्रमाणात नागरी सहकारी बँकांना ते शक्य नसते. तथापि वसुलीवर योग्य तो भर देऊन, कर्ज देताना पुरेशी काळजी घेऊन थकीत कर्जाचा आकडा आटोक्यात ठेवणे नागरी सहकारी बँकांना शक्य आहे. याबाबतीत कर्ज व्यवहार आणि वसुलीकडे लक्ष दिल्यास निश्चितपणे प्रगती होऊ शकेल, असा विश्वास आहे.

रिझर्व बँकेने दिलेल्या प्रगतिपुस्तकाप्रमाणे नागरी सहकारी बँकांना सुधारण्यासाठी अजून प्रयत्न करावे लागतील. बँकिंगमधील स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी ते आवश्यक राहील.

**– डॉ. अभय मंडलिक (लेखक बँकिंग विषयाचे अभ्यासक असून खामगाव अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक आहेत.) ✲✲✲✲✲**



## जळगाव जनता सहकारी बँकेच्या वतीने बेंडाळे परिसरात वृक्षारोपण उपक्रम

**जळगाव** – जळगाव जनता सहकारी बँकेच्या वतीने बेंडाळे परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. गेल्या सात वर्षांत या परिसरात दरवर्षी राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमांतर्गत आतापर्यंत १०० हून अधिक झाडे लावण्यात आली. बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने उपाध्यक्ष सीए नितीन झवर संचालक मधुकर पाटील संचालिका डॉ. आरती हुजूरबाजार, संध्या देशमुख, गणेश कॉलनी शाखेचे खातेदार पांडुरंग इंगळे, अमोल इंगळे, नगरसेवक नरेंद पाटील, सामाजिक कार्यकर्ते अतुल बारी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच नागरिक उपस्थित होते.

* बँकेच्या वतीने फराळ वाटप – देवशयनी आषाढी एकादशी निमित्त यंदाही बँकेच्या वतीने पिंप्राळा शाखेत फराळ वाटपाचे आयोजन शाखा परिसरात वृक्षदिंडी व दिंडीनिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. बँक अध्यक्ष सतीश मदाने उपाध्यक्ष सीए नितीन झंवर, माजी अध्यक्ष संजय बिर्ला, ग. स. सोसायटी माजी अध्यक्ष अजबसिंग पाटील, बँक संचालक मधुकर पाटील, हिरालाल सोनवणे, संचालिका संध्या देशमुख, शाखा ग्राहक तक्रार सदस्य गिरीष नाईक नागरिक, शाखाधिकारी प्रियंका झोपे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार विजेते आस्कर दांपत्याचा गौरव

**नवरगाव** – महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार संपादन करणारे रत्नमाला सुरेश आस्कर आणि सुरेश आस्कर यांचा सन्मान येथील भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने नुकताच करण्यात आला. पतसंस्था अध्यक्ष किशोर महालक्ष्मे यांच्या हस्ते आस्कर दांपत्याला गौरविण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे संचालक, पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

* **पतसंस्थेच्या वतीने वृक्षारोपण** – आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताहाच्या निमित्ताने पतसंस्थेच्या वतीने ५१ विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी रा. स्व. संघ विठ्ठल प्रभात शाखेचे कार्यवाह मुकुंद घरोटे, मुख्याध्यापक पंकज कोनेर, अध्यक्ष किशोर महालक्ष्मे, सहकार भारती चंद्रपूर नगराध्यक्ष रवींद्र पांडे, स्वामी विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्था गुरुदास मंगर, पतसंस्थेचे विभागीय व्यवस्थापक आतिश कानापूरवार, तसेच अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## सहकार सप्ताह निमित्त मौलाना आझाद पतसंस्थातर्फे वृक्षारोपण

जळगाव – सहकार सप्ताह निमित्त येथील मौलाना आझाद पतसंस्थातर्फे येथील मोहम्मदीया अँग्लो उर्दू हायस्कूलमधे वृक्षारोपण करण्यात आले. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कुणाल सोनार व ज्येष्ठ लिपिक किरण जाधव संस्थेचे संचालक उत्तम थोरात उपाध्यक्ष. मनोज काबरा कमळ दूध डेअरी अध्यक्ष अंबादास पाटील राणी लक्ष्मीबाई महिला पतसंस्था तज्ञ संचालक वामन फासे तसेच संचालक व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## शिक्षण क्षेत्रातील यशासाठी मेहनत, शिस्त, सातत्य आवश्यक – संजय चौधरी

**चंद्रपूर** – शिक्षण क्षेत्रातील यशासाठी मेहनत, शिस्त आणि सातत्य याची आवश्यकता आहे, असे मनोगत विश्व हिंदू परिषदेचे प्रांत समरसता प्रमुख संजय चौधरी यांनी केले आहे. नवरगाव निवेदिता महिला सोसायटीच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. उमेश इंदूरकर आणि संस्था अध्यक्ष सुनंदा बाकरे व्यासपीठावर होते.

ते म्हणाले, शिक्षणासोबत राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यासाठी काम करण्याची गरज आहे आणि त्याची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करण्याची मानसिकता असली पाहिजे. या वेळी डॉ. इंदूरकर यांनी मनोगत व्यक्त केले. वैशाली बोडणे यांनी प्रास्ताविक तर वर्षा गायकवाड यांनी आभार मानले.


# सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या;
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. व्यंकटेश कुलकर्णी (प्रशिक्षण प्रमुख) – ९४०३० ८०७५१**
**श्री. उदय पेंडसे (संचालक) – ९८६९० ३४६६२**

* **प्रशिक्षण कार्यालय** – फ्लॅट नं. ३, रामेश्वर अपार्टमेंट, साई सर्व्हिस पेट्रोल पंपामागे, पूलाची वाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४ **ई–मेल** – sahakarprashikshan@gmail.com

## सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती - संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |

| कोकण विभाग | | |
|---|---|---|
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 9867678092 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| धुळे | श्री. कृष्णा जाधव | 8482993517 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| नाशिक | श्री. नितीन बीबीकर | 9665778497 |

| मराठवाडा विभाग | | |
|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | श्री. योगेश भोसले | 9421704116 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| नांदेड | श्री. संदीप चिलकेवार | 7507921655 |

| विदर्भ विभाग | | |
|---|---|---|
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |

## सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

| क्र. | पुस्तकाचे नाव (लेखक) | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार महर्षी ग्रंथ | १५००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन (अनिल दोशी) | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण (डॉ. अभय मंडलिक) | १२५/- |

| क्र. | पुस्तकाचे नाव (लेखक) | किंमत |
|---|---|---|
| ४ | बँकिंग साक्षरता (गणेश निमकर) | ३५०/- |
| ५ | सरकारी कर्जरोखे (जयंत काकतकर) | २५०/- |
| ६ | गोष्ट साखरेची (साहेबराव खामकर) | ७५/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

**सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून-**
**वार्षिक रु. ७००/- त्रैवार्षिक रु. १८००/-**

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 07801110000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

safe age
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

| ISO 14001 : 2004 | IS 5244 : 2014 CM/L-7500087614 | IS 550 : 2014 CM/L-3978088 | IS 11188 : 2014 CM/L-2870669 | ISO 9001 : 2008 |
|---|---|---|---|---|



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor

**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

**Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.**

**Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur**

**We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,**


स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
1995-2025
लोक
मन्सून
योजना 2026
या पावसाळ्यात,
आपल्या गुंतवणुक वाढीला द्या
नवी दिशा.
*प्रतिवर्ष
9.75%
* नियम व अटी लागू योजना फक्त सभासदांसाठी
मुदत ठेव १८ महिने
किमान ठेव ₹१0,000/-
वरिष्ठ नागरिक
0.५0%अतिरिक्त व्याज दर
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 lokmanyasociety.org

THE YAVATMAL URBAN CO-OP., BANK LTD., YAVATMAL

दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

वारसा विश्वासाचा

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 | फोन : 07232-244241, 243703, 237442

Mail - ho_adm@yavatmalurbanbank.com | Website - www.yavatmalurban.bank.in

# अमृत वर्षा

## पुनर्गुंतवणूक ठेव योजना

**6.60%*** योजनेचा सामान्य व्याजदर

**7.10%*** जेष्ठ नागरिकांकरिता व्याजदर

गुंतवणूक कालावधी **444 दिवस**

अंतिम तारीख - **31 मार्च 2027 पर्यंत**



**डॉ. नितीन खर्चे**
अध्यक्ष

**अजिंदरसिंह चावला**
उपाध्यक्ष

**श्रीधर कोहरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

- संचालक -

श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरुण माधमशेट्टीवार,
श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान,
श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे,
श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक),
ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

# बँकेकडे कर्जासाठी उपलब्ध केंद्र व राज्य सरकारच्या विविध सबसिडी योजना

1. PMEGP Prime Minister's Employment Generation Programme
प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना

2. PMAY - Pradhan Mantri Awas Yojna - Urban २.० प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०

3. PMFME Pradhan Mantri Formalisation of Micro Food Processing Enterprises
प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना

4. PM-KUSUM (Pradhan Mantri Kisan Urja Suraksha Evam Utthan Mahabhiyan)
प्रधानमंत्री मंत्री किसान उर्जा सुरक्षा एवंम उथ्थान महाभियान

5. PM - SURYA GHAR MUFT BIJLI YOJANA
पी.एम. - सुर्यघर मोफत विज योजना

6. CLCSS Credit Linked Capital Subsidy Scheme

7. APAMVM- Annasaheb Patil Aarthik Magas Vikas Mahamandal
अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

8. AIF - National Agriculture Infra Financing Facility
राष्ट्रीय कृषी पायाभूत वित्तपुरवठा सुविधा (नाबार्ड पुरस्कृत)

9. NLM National Livestock Mission
राष्ट्रीय पशुधन अभियान

10. NABARD Interest Subvention Scheme

11. CGTMSE (सूक्ष्म आणि लघु उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट)

12. महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत)
ACADEMY OF MAHARSHTRA RESEARCH, UPLIFTMENT AND TRAINING (AMRUT)

Since 1935

SUB का साथ, आपका विकास

# सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली

(शेड्युल्ड को-ऑप. बँक)

प्रधान कार्यालय : ४०४, खणभाग, सांगली ४१६४१६, फोन : (०२३३) २३७६२३६ /३७/३८

मोबाईल : ७८८८००९७१८

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




सहकार भारती प्रकाशित
सहकार सुगंध निर्मित...

# सहकार महर्षी

सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ




- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

सहकार महर्षी ग्रंथ - प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | - | रु. १५००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | - | रु. १३५०/- प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | - | रु. १२००/- प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!



50+ YEARS OF MOMENTUM
हर पल PROGRESSIVE
THE KALYAN JANATA SAHAKARI BANK LTD.
MULTI-STATE SCHEDULED BANK
MONSOON LOAN CARNIVAL
HOME LOAN
7.60%*
GOLD LOAN
8.90%*
CAR LOAN
8.20%*
Easy Approval | Quick Processing | No Prepayment Charges *
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.bank.in
KJSBank

Registered - SAHAKAR SUGANDHA - PRGI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Contract No. : BP/EP 40280299 Customer ID : 3000071496
(Publication Date - 05/08/2026) Posting on 07/08/2026 Posting at BMI Pune PSO, Pune 411001

